
७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
दैनिक
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
# संध्या
शुक्रवार, दि. ०३ एप्रिल २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०९८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# पुण्यात पावसाचे तांडव

## पुण्यात १०० मिमी पाऊस, १३० वर्षांनी एप्रिलचा विक्रम मोडीत : येत्या ४ दिवसात प्रचंड पावसाचा अंदाज, आज ७ जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट

**पुणे (दै. संध्या)**

पुणे शहराला गुरुवारी दुपारी तुफानी वाऱ्यासह तासाभरातच १०० मिमी पाऊस झाला. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार पुण्यात याआधी ४ एप्रिल १८९६ रोजी ५१.१ मिमी पावसाची नोंद झाली होती. गुरुवारच्या पावसाने स्वारगेट बसस्थानक, शिवाजीनगरातील सखल भागांत पाणी साचून वाहतुकीची कोंडी झाली. अनेक वसाहतींतील घरांत पाणी शिरले. ८२ ठिकाणी झाडे पडली. झाड पडून रंजना नवनाथ गिरी (६०) फूल विक्रेत्या महिलेचा मृत्यू झाला.




दरम्यान, जळगावमध्ये सलग दुसऱ्या दिवशी गारपिटीसह झालेल्या पावसाने २५४१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. याशिवाय सोलापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगरातही हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. येते चार दिवस कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्यम महाराष्ट्रात वीज, ढगांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. जळगाव, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली - ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, गुरुवारी महाबळेश्वर येथे सर्वात कमी १७.३. तर अकोला येथे सर्वाधिक ३९.१ अंश तापमान होते. जळगाव शहरासह पारोळा, अमळनेर, चोपडा, धरणगाव आणि धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा आणि साक्री पट्ट्यात सलग दुसऱ्या दिवशी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. तर दोंडाईचात गारा पडल्या. जळगाव जिल्ह्यात दोन दिवसात सहा तालुक्यांमधील सुमारे २५४१.०५ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली असून, ४०४२ शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. गुरुवारी पारोळ्यातील भोकरबारी, लोणी परिसरात झाडे उन्मळून पडली.

### फुल विक्रेत्या रंजना गिरी यांचा दुर्दैवी अंत

पुणे शहरातील सिंहगड रोड परिसरात अवकाळी पावसात एक दुर्दैवी घटना घडली असून नवश्या मारुती मंदिराशेजारील पिंपळाचे भले मोठे झाड अचानक कोसळल्याने एका साठ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मृत महिलेचे नाव रंजना नवनाथ गिरी (वय 60) असे असून त्या परिसरात फुल विक्रीचा व्यवसाय करत होत्या. दररोजप्रमाणे त्या मंदिराजवळ आपला व्यवसाय करत असताना अचानक हे झाड कोसळले. झाड कोसळण्याचा आवाज मोठा असल्याने परिसरातील नागरिक तत्काळ घटनास्थळी धावून आले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ बचावकार्य सुरू करत महिलेस झाडाखालून बाहेर काढले. मात्र त्यावेळी त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले, परंतु उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## पुण्यात पावसाळी लाईन कामांचा हिशेब जाहीर करा : आयुक्तांकडे मागणी

**पुणे (दै. संध्या)**



शहरात अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचल्याच्या पार्श्वभूमीवर, गेल्या चार वर्षांत करण्यात आलेल्या पावसाळी लाईन (स्टॉर्म वॉटर ड्रेनेज) कामांचा सविस्तर अहवाल जाहीर करावा, अशी मागणी "आपले पुणे आपला परिसर" संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे. नुकत्याच झालेल्या प्रचंड वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे शहरातील बहुतांश भागांत पाणी तुंबले होते. यामुळे रस्ते, सोसायट्या आणि सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले, ज्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर, पावसाळी लाईनची कामे प्रत्यक्षात किती झाली आणि ती पूर्ण झाली की अर्धवट राहिली, याचा आढावा घेणे आवश्यक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. गेल्या चार वर्षांत या कामांवर सुमारे दीडशे कोटी रुपयांचा खर्च झाल्याची माहिती समोर येत आहे. या खर्चाचा तपशील आणि कामांची ठिकाणनिहाय माहिती पुणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे प्रशासनाला कामांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करता येईल आणि आगामी पावसाळ्यासाठी योग्य नियोजन करणे शक्य होईल, असे माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी संयुक्तपणे सांगितले. या मागणीसोबतच, नगर अभियंता यांना तातडीने या कामांचा सविस्तर आढावा घेण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंतीही करण्यात आली आहे. हा विषय केवळ आरोप-प्रत्यारोपांचा नसून, शहरातील पावसाळी व्यवस्थापन सुरळीत राहावे हाच या मागणीमागील मुख्य उद्देश असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## विधानभवनात बनावट पास विक्री करणारे सहा कर्मचारी निलंबित होणार

**मुंबई (दै. संध्या)**



अर्थसंकल्पीय अधिवेशनात बनावट पासची विक्री करण्यात आली होती. महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या नावाने बनावट लेटरहेडचा वापर करून प्रवेशिका वाटण्यात आल्या. यावरून विधान परिषदेत विरोधकांकडून सरकारवर जोरदार टीका करण्यात आली. यानंतर तत्काळ कारवाईचा बडगा उचलण्यात आला असून सात जणांना अटक करण्यात आली. त्यापैकी विधिमंडळ सचिवालयातील चार आणि मंत्रालयातील दोन अशा सहा कर्मचाऱ्यांवर आता सरकारी सेवेतून निलंबनाची कारवाई होणार आहे.

विधान परिषदेत विरोधकांनी बनावट प्रवेशिकांचा मुद्दा उचलून धरल्यानंतर सरकारलाही त्यावर तत्काळ स्पष्टीकरण द्यावे लागले व तत्काळ कारवाईही करावी लगाली. विरोधकांच्या टीकेनंतर अधिवेशनादरम्यान महाराष्ट्र औद्योगिक महामंडाळाच्या नावाने बनावट लेटरहेडचा वापर करून प्रवेशिका वाटण्यात आल्याची खळबळजनक कबुली उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली.

महामंडळाच्या बनावट लेटरहेडवर विभागातील अधिकाऱ्यांची नावे व पदे नमूद करून प्रवेशिका वाटण्यात आल्याचे सामंत यांनी सांगितले. या प्रकरणाची सचिवालयाच्या सुरक्षा विभागाकडून चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली. विधिमंडळ सचिवालय आणि मंत्रालयातील कर्मचारी यांनी संगनमताने औद्योगिक महामंडाळाच्या बनावट लेटरहेडचा वापर करून अनधिकृत प्रवेशिका वाटल्याचे समोर आले. यासंदर्भात ७ जणांवर मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये दत्तात्रय गुंजाळ या बाहेरच्या व्यक्तीचा समावेश आहे. दरम्यान, सरकारी नियामानुसार ४८ तासांपेक्षा जास्त काळ पोलीस अटकेतील व्यक्तीला निलंबित केले जाते. त्यानुसार विधानभवनातील कर्मचारी मनोज मोरबाळे, महेश दुम्पलवार, स्वप्नील तायडे, लवेश नाकडे तर मंत्रालयातील गणपत जावळे, नागेश पाटील या सहा जणांवर यांच्यावर कारवाई होणार आहे.

# अवकाळी पावसामुळे वीजपुरवठ्यात व्यत्यय

## झाडे पडणे, पाणी तुंबल्यामुळे वीजवाहिन्या बाधित; दुरुस्तीचे काम वेगाने सुरू

**पुणे (दै. संध्या)**

पुणे शहर व परिसरात गुरुवारी (दि. २) दुपारी विजांच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि वादळामुळे अनेक अतिउच्चदाब (EHV) व उच्चदाब वाहिन्यांमध्ये बिघाड (Tripping) झाल्याने पुणे शहरातील अनेक भागांतील वीजपुरवठ्यावर त्याचा परिणाम झालेला असून महावितरणचे वीज कर्मचारी वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर परिश्रम घेत आहेत. अनेक भागांचा बाधित झालेला वीजपुरवठा शक्य तितक्या लवकर सुरु देखील करण्यात आला आहे. साधारणत: तासभर झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी वाहिन्यांवर झाडे पडली आहेत. तर काही ठिकाणी फिडर बॉक्स पाण्यात गेल्यामुळे वीज वाहिन्या बंद पडल्या. तर विजेच्या कडकडाटांमुळे ही काही ठिकाणी वीज वाहिन्या बाधित झाल्या आहेत.



कोथरुड – भागात कुंदनगरी फिडरवर विजेच्या कडकडाटामुळे आकाशातील विजेला अटकावर करणारी यंत्रणा बाधित झाली. त्यामुळे संबंधित वाहिनीचा वीजपुरवठा ठप्प झाला होता. मात्र पर्यायी मार्गाने या भागातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. आता केवळ २ रोहित्र बंद आहेत. नांदेडसिटी अतिउच्चदाब वाहिनीवर ट्रिपिंग आल्यामुळे अर्ध्यातासासाठी कोथरुड विभागातील वीजपुरवठा बाधित झाला होता. पाऊस थांबताच वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

शिवाजीनगर – विभागातील विद्यापीठ, खडकी, बावधन, बाणेर, शिवाजी हाऊसिंग सोसायटी या वाहिन्यांचा वीजपुरवठा बाधित झाला असून विद्यापीठ वाहिनी सुरु करण्यात यश मिळाले.

पिंपरी/भोसरी – या भागातील रावेत २२ केव्ही वाहिनीचा वीजपुरवठा खंडित झाला असून, यावरील ५८ रोहित्रे बंद पडली आहेत. त्याला पर्यायी मार्गाने सुरु करण्याचे प्रयत्न महावितरण कर्मचारी करीत आहेत.

पर्वती – या भागातील महावितरणच्या जुन्या पर्वती वीज उपकेंद्रातील फिडरवर झाड पडले होते. त्याला हटवून वीजपुरवठा सुरु करण्याचे काम सुरु आहे. तर प्रयेजा व मधुकोश वाहिनीच्या इनकमिंग फिडर बॉक्स भागात पाणी साचल्याने वीजपुरवठा बंद झाला आहे. खडकवासला, श्रवण वाहिनीच्या पेट्रोलिंगचे काम हाती घेतली असून, बिघाड सापडताच दुरुस्ती केली जाणार आहे.

बंडगार्डन – या विभागात वडाचीवाडी या उपरी वीज वाहिनीवर झाडाच्या फांद्या पडल्याने त्या भागातील वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद झाला आहे. तर वाडिया वाहिनीला तासाभरातच पर्यायी मार्गाने सुरु करण्यात आले आहे.

रास्तापेठ- विभागातील कोंढवा, येवलेवाडी या भागाला वीजपुरवठा करणाऱ्या अतिउच्चदाब वाहिनीवर परिणाम झाल्याने या भागातील वीजपुरवठा देखील बाधित झालेला आहे.

### विजेच्या तक्रारींसाठी टोल फ्रीचा वापर करावा

वीजग्राहकांनी विजेसंबंधिच्या सर्व तक्रारींसाठी महावितरणच्या 1912, 18002333435 व 18002123435 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. हे क्रमांक www.mahadiscom.in या संकेतस्थळावर व वीजबिलावर प्रकाशित केले आहेत. महावितरणच्या मोबाईल ॲपवर देखील सर्व सुविधा २४ तास उपलब्ध आहेत.

## ब्रेकिंग न्यूज

### जलसाठ्यात वाढ

पुणे (दै. संध्या) : अवकाळी पावसाने गुरुवारी (दि. २) खडकवासला धरण क्षेत्रातही विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळल्या असून, अडीच तासांत १०४ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली. त्यामुळे धरणातीलपाणीसाठ्यात किंचित वाढ झाली असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. शहर आणि परिसरासह जिल्ह्याच्या काही तालुक्यांत गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पाऊस जोरदार हजेरी लावत आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण क्षेत्रातही पावसाच्या सरी कोसळल्या. मात्र, लगत असलेल्या पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरण क्षेत्रात तुरळक पाऊस झाला असल्याचे जलसंपदा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. खडकवासला धरणात झालेल्या पावसामुळे जलसाठ्यात किंचित वाढ झाली आहे. चारही धरणांत मिळून १३.८९ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच ४७.६५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत एक टीएमसी जादा पाणीसाठा असल्याचे जलसंपदा विभागाकडून नमूद करण्यात आले. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार जिल्ह्यात अनेक ठिकाणी शनिवारपर्यंत (दि. ४) मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटांसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## दै. संध्या अँकर — मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री बावनकुळे यांचा निर्णय

# महसूल विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील महसूल प्रशासनातील कामाचा वाढता व्याप आणि नागरिकांना जलद सेवा मिळावी, या उद्देशाने महसूल विभागाचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष पुढाकाराने घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे महसूल विभागाच्या रचनेत मोठे बदल होणार असून एकूण ३५ हजार ८७६ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. मुद्रांक, भूमी अभिलेख आणि महसूल विभाग या तिन्ही विभागांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.



### ३५ हजार ८७६ पदांसह प्रशासकीय रचनेत मोठे बदल

तब्बल वीस वर्षांनंतर महसूल विभागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध सरकारने मान्य केला असून आज याबाबतचा शासन निर्णय जारी झाला आहे. याआधी, महसूल विभागातील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध २००६ मध्ये झाला होता. मागील वीस वर्षांत महसूल व बिगर महसुली कामात अनेक बदल झाले, त्यामुळे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्याशी याबाबत चर्चा केली. त्यानंतर, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने या आकृतिबंधाला मान्यता दिली. महसूल विभागातील ३४ हजार ५७६ नियमित व १३०० बाह्यस्रोतांद्वारे असे मिळून ३५,८७६ पदांचा आकृतीबंध महाराष्ट्र शासनाने मान्य केला आहे.

शासनाने महसूल विभागाची नवीन संरचना निश्चित केली असून, यामध्ये विभाग, जिल्हा आणि तालुका पातळीवरील कार्यालयांचा समावेश आहे. यात ६ विभागीय आयुक्तालये, ३६ जिल्हाधिकारी कार्यालये, १९२ महसूल उपविभागीय कार्यालये आणि ३६० तहसीलदार कार्यालयांचा समावेश आहे. तसेच क्षेत्रीय स्तरावर २,६२५ मंडळ कार्यालये आणि १५,७४७ तलाठी साजांची पदे मंजूर करण्यात आली आहेत. प्रशासकीय सोयीसाठी ११ नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालये आणि ८ नवीन उपविभागीय कार्यालय, २ तहसीलदार कार्यालय, ६९ अपर तहसीलदार कार्यालयांना मान्यता देण्यात आली आहे.


"महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा असून, काळानुरूप वाढलेला कामाचा व्याप आणि लोकांच्या गरजा लक्षात घेऊन हा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. यामुळे प्रशासकीय कामात अधिक सुसूत्रता येईल, नवीन कार्यालयांमुळे जनतेला कामासाठी दूर जावे लागणार नाही आणि कामकाजात मोठी गती येईल. पारदर्शक आणि गतिमान प्रशासनासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे महसूल मंत्री, चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

राज्यातील महसूल यंत्रणा अधिक लोकाभिमुख आणि सक्षम करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला होता. उमाकांत दांगट समितीच्या शिफारशींनुसार हा सुधारित आराखडा तयार करण्यात आला असून, यामुळे महसूल विभागाच्या कामकाजात आधुनिकता आणि वेग येणार आहे. नवीन कार्यालयांचे मुख्यालय आणि कार्यक्षेत्र निश्चित करण्याची प्रक्रिया आता जिल्हाधिकारी स्तरावर वेगाने पूर्ण केली जाणार आहे.

## अमेरिका-इराण युद्धामुळे पाकिस्तान हवालदील, दरवाढीनं कंबरडं मोडलं

### पेट्रोल ४५० तर डिझेल ५०० रुपये लिटर!

**मुंबई (दै. संध्या)**



अमेरिका-इराण युद्धाचा फटका आता जगातील अनेक देशांना बसत असल्याचं पाहायला मिळत आहे. पश्चिम आशियातील या युद्धामुळे कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत होत आहे. यातच होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलाच्या वाहतुकीला अडथळे निर्माण होत असल्यामुळे जगावर ऊर्जा संकट घोंघावत आहे. भारताच्या शेजारी असलेल्या पाकिस्तानमध्ये कच्च्या तेलाच्या तुटवड्याचं संकट उभं ठाकलं आहे. अमेरिका-इराण युद्धाचा पाकिस्तानला मोठा फटका बसत आहे. यातच आता पाकिस्तानचे पेट्रोलियम मंत्री अली परवेझ मलिक यांनी गुरुवारी इंधनाच्या दरात मोठी दरवाढ करण्याची घोषणा केली आहे. या घोषणेनंतर पाकिस्तानात आता पेट्रोल ४५० पाकिस्तानी रुपये (PKR) प्रति लिटर आणि डिझेल ५०० पाकिस्तानी रुपये (PKR) प्रति लिटरवर पोहोचलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. वृत्तानुसार, पाकिस्तान सरकारने गुरुवारी पेट्रोलच्या दरात प्रति लिटर १३७.२४ पाकिस्तानी रुपये आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर १८४.४९ पाकिस्तानी रुपये एवढी वाढ केली आहे. या दरवाढीच्या निर्णयामुळे पाकिस्तानात आता पेट्रोल प्रति लिटर ४५८.४ पाकिस्तानी रुपये आणि डिझेल प्रति लिटर ५२०.३५ पाकिस्तानी रुपयांवर पोहोचलं आहे. हे सुधारित दर शुक्रवारपासून लागू करण्याचे निर्देशही पाकिस्तान सरकारने दिले आहेत.

दरम्यान, केरोसीनच्या दरातही प्रति लिटर ३४.०८ पाकिस्तानी रुपयांची वाढ करण्यात आली असून आता पाकिस्तानात केरोसीनही ४५७.८० पाकिस्तानी रुपये प्रति लिटरवर पोहोचलं आहे. दरम्यान, अमेरिका-इराण युद्ध सुरू झाल्यानंतर पाकिस्तान सरकारने सुरुवातीला ६ मार्च रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ५५ पाकिस्तानी रुपयांनी दरवाढ केली होती. तसेच त्यानंतर ९ मार्च रोजी इंधनाबाबत काटकसर करण्यासाठी काही उपाययोजनाही जाहीर केल्या होत्या. मात्र, त्यानंतर आता पुन्हा एकदा इंधन दरवाढ करण्यात आली आहे.

## संपादकीय

# जिवंत बॉम्ब घेऊन छोट्या मुलांनी खेळ मांडलाय!

२०१७ साली प्रसिद्ध झालेल्या 'लाइफ ३.०: बिइंग ह्युमन इन द एज ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या महत्त्वपूर्ण ग्रंथात मॅक्स टेगमार्क या भौतिक आणि विश्वशास्त्रज्ञांनी बुद्धिमत्तेच्या भविष्याबद्दलचा एक विशिष्ट दृष्टिकोन आपल्यासमोर ठेवला आहे. पुस्तकाचा मुख्य संदेश जीवसृष्टीच्या उत्क्रांतीच्या वर्गीकरणावर आधारित आहे. जीवसृष्टी १.० : या जैविक टप्प्यात बॅक्टेरियासारख्या सजीवांचा समावेश होतो. ते आपल्या हार्डवेअर किंवा सॉफ्टवेअरची पुनर्रचना करू शकत नाहीत. जीवसृष्टी २.० : यात मानव येतात. नव्या भाषा, कौशल्ये आणि मूल्ये आत्मसात करून ते आपले सॉफ्टवेअर बदलू शकतात. परंतु बदलासाठी युगानुयुगे लोटावी लागणाऱ्या हार्डवेअरशी मात्र घट्ट बांधलेले राहतात. टेगमार्क यांचा मुख्य सिद्धांत हा की आपण आता जीवसृष्टी ३.० च्या उंबरठ्यावर उभे आहोत. या टप्प्यावर जीवन आपल्या सॉफ्टवेअरची आणि हार्डवेअरचीही पुनर्रचना करू शकेल. स्वतःच्या उत्क्रांतीची सूत्रे सर्वथा जीवनाच्याच हाती येतील. बुद्धिमत्ता म्हणजे माहितीवर प्रक्रिया करण्याचा एक आकृतिबंध असून, त्यासाठी जैविक मेंदूच्या (वेटवेअर) अस्तित्वाची काहीही आवश्यकता नाही, असा युक्तिवाद टेगमार्क यांनी केला. याच भूमिकेची अटळ परिणती कृत्रिम सर्वसाधारण बुद्धिमत्तेच्या उदयात झाली. दुर्बुद्धी किंवा दुष्टता नव्हे, तर अफाट क्षमता हाच एआयचा खरा धोका आहे. मानवजातीचा विनाश करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेला मानवाविषयी द्वेष वाटण्याची मुळीच आवश्यकता नाही. मानवजातीबद्दल केवळ उदासीन असणे त्यासाठी पुरेसे आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर कृत्रिम बुद्धिमत्तेचा पट आश्चर्यकारक गतीने बदलल्यामुळे टेगमार्कना आपल्या दृष्टिकोनातही लक्षणीय फेरबदल करावे लागले आहेत. आज विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाचे स्वरूप आणि वेग यासंबंधीची घोर चिंता हे त्यांच्या जागतिक दृष्टिकोनातील फेरबदलाचे मुख्य कारण आहे. अकस्मातच GPT-5 सारख्या बृहत भाषा प्रणालींचा स्फोटक उदय झालेला आहे. प्रचंड डेटा आणि अवाढव्य व्याप्तीमुळे अगदी 'सॉफ्टवेअर रिडिझाइन' सदृश्य वर्तन दिसू लागले आहे. यापूर्वी लाइफ ३.०च्या अंतिम टप्प्यातच अशा वर्तनाची शक्यता त्यांनी कल्पिली होती. आता मानवी दर्जाची एआय ही टेगमार्कना या शतकाची नव्हे तर चक्क या दशकातील शक्यता वाटते. त्यांचा 'सजग आशावाद' आता विरला असून, त्याची जागा त्यांच्याच शब्दांत 'आत्मघातकी शर्यतीने घेतली आहे. तंत्रसम्राटांमधील स्पर्धेच्या दबावाने, सुरक्षेचा दर्जा तळाशी नेणारी शर्यत सुरू झाली आहे. म्हणूनच महाकाय एआय प्रयोगांना थोडी खीळ घातली पाहिजे या भूमिकेचे टेगमार्क हे पुरस्कर्ते बनलेले आहेत. ते आता या क्षेत्रात सरकारी हस्तक्षेप आणि नियमनाची मागणी करत आहेत. उच्च प्रतीच्या सहानुभावाची, सामाजिक बुद्धिमत्तेची आणि सर्जनशीलतेची आवश्यकता असणारी सर्व कामे प्रदीर्घ काळ केवळ माणसांसाठीच राखीव राहतील असे त्यांनी लाइफ ३.० मध्ये सुचवले होते. परंतु मानवी भाषा हाताळण्याची, सहानुभावाची नक्कल करण्याची आणि उच्च प्रतीच्या कलेची आणि कोडची निर्मिती करण्याची एआयची अफाट क्षमता पाहून, या यंत्रांना आपले सांस्कृतिक सॉफ्टवेअर भेदणे आपल्या कल्पनेपेक्षा खूपच सोपे जाणार असल्याची जाणीव आता त्यांना झाली आहे. त्यामुळेच सत्याचा ह्रास आणि कृत्रिम सामान्य बुद्धिमत्ता करू शकत असलेला सामाजिक हस्तक्षेप यामुळे परा-बुद्धिमत्तेची प्रत्यक्ष निर्मिती होण्यापूर्वीच मानवी समाज पुरता ढासळू शकेल, असा इशारा ते देतात. आपल्या पुस्तकात टेगमार्क यांनी भविष्याविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. आपल्यापेक्षा कितीतरी पटीने बुद्धिमान असलेल्या प्रज्ञावंत घटकावर आपण कसे नियंत्रण ठेवू शकू? हा त्यातला प्रमुख प्रश्न. इतिहासात नेहमीच अधिक बुद्धिमान घटकाने कमी बुद्धिमान घटकावर ताबा मिळवल्याचे दिसून येते.

## संस्कृत सुभाषित

सदा लोकहिते युक्ता: रत्नदीपा इवीत्तमा: ।।

अर्थ : लोककल्याणात रममाण झालेले लोक रत्नाच्या दिव्याप्रमाणे कशाचीच अपेक्षा धरत नाहीत, तर ते दुसऱ्यासाठीच तेवत असतात.

## गुरु वचन

### इतरांचेही दु:ख पहा

एकदा एका झाडाखाली सशांनी आपली एक तातडीची सभा बोलावली. सर्वच ससे दु:खी आणि घाबरलेले होते. एक ससा उभा राहून म्हणाला, ''मित्रहो, आपलं जीवन फारच दु:खी आहे आणि या दु:खातून आपली सुटका होणे कधीही शक्य नाही. आपल्याला मनुष्य, कुत्रा, गरूड आणि इतरही अनेक लहान मोठ्या प्राण्यांपासून धोका आहे. तेव्हा आपण सर्वचजण एखाद्या तलावात जाऊन जीवन देऊया.

जिवंतपणी या अनंत यातना भोगण्यापेक्षा मरण परवडले. शिवाय आपण एकत्र मरू. म्हणजे दुसऱ्याच्या मरणाचे दु:खही करायला नको.'' त्या सशाचे बोलणे सर्व सशांना पटले. त्या सर्वांनी एकाच वेळी प्राणत्याग करण्याचे ठरवले. प्राणत्याग करण्याचा दिवसही ठरविला गेला.

ठरलेल्या दिवशी सर्व ससे आपल्या कुटंबातील लहानथोरांसह एकत्र जमले. थोड्याच वेळात सशांचा एक मोठा समूह तळ्याकाठी आला. त्या तळ्याकाठच्या चिखलात बरेच लहानमोठे बेडूक खेळत होते. सशांना पाहून ते घाबरले आणि त्यांनी भराभर तळ्यात उड्या टाकल्या. ते पाहून एक हुशार ससा म्हणाला,

''मित्रांनो, थांबा. घाई करू नका. आता तुम्ही पाहिलंत ना. आपल्याला घाबरणारे प्राणीही या जगात आहेत. त्यांचं दु:ख आपल्यापेक्षाही मोठं आहे. तरीही ते हिंमत बाळगून जगताहेत ना मग आपण कशाला दु:खी आणि निराश व्हायचं! या प्राण्यांपेक्षा आपण सुखी आहोत.

तेव्हा आपल्यापेक्षा सुखी प्राण्यांकडे न पहाता दु:खी प्राण्यांकडे पाहून आपण जगायला हवे. म्हणजे आपले दु:ख आपल्याला जाणवणार नाही. तेव्हा चला आता आपआपल्या घरी आणि आनंदाने जगा.'' त्या सशाचे बोलणे सर्वांनाच पटले. आनंदाने उड्या मारीत ते आपापल्या घरी परतले.

## उपदेशकथा

### खरा मित्र

दोन सैनिक बरोबरीने चालले होते, तेवढ्यात त्यांना तीन दरोडेखोर दिसले. त्याबरोबर त्यातला एकजण पळाला आणि दुसरा धैर्याने त्यांच्याशी लढू लागला. थोड्या वेळात सैनिकाने दरोडेखोरांना पळवून लावले. ते पाहून तो पळून गेलेला भित्रा सैनिक धावत आला आणि तलवार उपसून आवेशाने म्हणाला, 'कुठे आहेत ते दरोडेखोर? कोणत्या माणसाशी गाठ आहे हे त्यांना चांगलं कळू दे.'

'अरे हेच तू आधी बोलला असतास तर..? ' तो दुसरा सैनिक म्हणाला, 'तेवढ्यानेही मला खूप मदत झाली असती पण आता मात्र तलवार म्यानात ठेव आणि तुझ्या जिभेला लगाम घाल कारण तुझी वरवरची वीरश्रीची भाषा मघाशी बोलला असतास तर मला खरीच वाटली असती. तुझ्या वरवरच्या भाषेने तू दुसऱ्या कुणाला बनवू शकशील पण माझ्याबद्दल म्हणशील तर तुझ्या पळण्यातला पराक्रम मी पाहिला आणि तुझ्या तथाकथित शौर्याची कायकिंमत करायची तेही मला आता चांगले कळले आहे आणि पूर्वी विद्वान लोकांनी म्हटलेच आहे की, खऱ्या मैत्रीची परीक्षा संकटाच्या वेळीच पहायची असते. त्यावेळी जो मदत करतो, तोच खरा मित्र.

कथा उपदेश : संकटाच्या वेळी जो मदत करतो तोच खरा मित्र.



## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:तैतिल २१:२२:५० |
| ३ एप्रिल २०२६ | सूर्य:मीन |
| शुक्रवार | चन्द्र:तुला०६:२८:२६ |
| विक्रम संवत्– २०८२ | हिजरी सन् – १४४५ |
| चैत्रशके संवत्– १९४८ | मुस्लिम मास – शव्वाल |
| संवत्सर –पराभवनाम | तारीख – १४ |
| अयन– उत्तरायणारंभ | विशेष |
| मास– चैत्र | शिरकाईदेवी यात्रा– शिरकोली (पुणे) |
| ऋतु– सौर वसंत | अंबानाथ यात्रा – सांगळूद (अकोला) |
| कृष्ण पक्ष | छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी (तारेखप्रमाणे) |
| तिथि:प्रतिपदा ०८:४२:४० | गुड फ्रायडे |
| नक्षत्र:चित्रा १९:२४:४० | |
| योग:व्याघात १४:०८:०३ | |
| करण:कौलव ०८:४२:४० | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | | | | | 5 | | 7 |
| 9 | 1 | | | 3 | 4 | | | 2 |
| 6 | | | | 9 | | | | 4 |
| | 4 | 9 | | | 6 | | 8 | 3 |
| | | | | 8 | | | | |
| 3 | 6 | | 1 | | | 9 | 2 | |
| 4 | | | | 7 | | | | 8 |
| 8 | | | 4 | 5 | | | 1 | 6 |
| 5 | | 6 | | | | | 7 | 9 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 6 | 4 | 3 | 8 | 2 | 1 | 7 |
| 7 | 3 | 8 | 1 | 2 | 6 | 9 | 4 | 5 |
| 1 | 4 | 2 | 5 | 9 | 7 | 3 | 6 | 8 |
| 8 | 7 | 5 | 2 | 6 | 3 | 1 | 9 | 4 |
| 9 | 6 | 4 | 7 | 5 | 1 | 8 | 2 | 3 |
| 2 | 1 | 3 | 8 | 4 | 9 | 5 | 7 | 6 |
| 6 | 8 | 9 | 3 | 1 | 4 | 7 | 5 | 2 |
| 3 | 2 | 1 | 6 | 7 | 5 | 4 | 8 | 9 |
| 4 | 5 | 7 | 9 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९५५ – बेलजियममध्ये चित्रपटगृहाला आग लागून ३९ ठार.
- १९६० – बेलजियमच्या हवरेमध्ये भूकंप.
- २००४ – श्रीलंकेतील निवडणुकीत चंद्रिका कुमारतुंगा यांच्या पक्षास बहुमत.

### राष्ट्रीय

- १९२७ – दलितांमध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती करण्यासाठी 'बहिष्कृत भारत' या साप्ताहिकाचे प्रकाशन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केले.

### जन्म

- १७८३ – अमेरिकन ऐतिहासिक निबंधकार आणि कथालेखक वाशिंग्टन आयव्हिंग याचा जन्म.
- १८३७ – जॉन बरोज या निसर्गशास्त्रज्ञाचा जन्म.
- १८८२ – द्वारकानाथ माधव पितळे–नाथमाधव यांचा जन्म.
- १९०३ – सामाजिक कार्यकर्त्या कमलादेवी चटोपाध्याय यांचा जन्म.
- १९१४ – संरक्षण दलाचे पहिले फील्ड मार्शल सॅम माणेकशा यांचा जन्म.

### निधन

- १६८० – छत्रपती शिवरायांचे निधन.
- १६८२ – बार्टोलोमे एस्तेबान मुरिल्लो या स्पॅनिश चित्रकाराचे निधन.
- १८९७ – योहानेस ब्राह्म्स या जर्मन संगीतकाराचे निधन.
- १९५६ – मराठी रंगभूमीवरील सुप्रसिद्ध अभिनेते चिंतोपंत गुरव (दिवेकर) यांचे निधन.
- १९७८ – हिंदसेवक समाजाचे संस्थापक व घटनातज्ज्ञ पं. हृदयनाथ कुंझरू यांचे निधन.
- १९८७ – अज्ञेय–सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन या हिंदी कवी व पत्रकाराचे निधन.

## : SMS :

In a scooter 3 sardar's were traveling,Traffic police showed his hands to stop them. But Sardar shouted, "sorry we are already 3.No more lift.."

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३५.२ | २२.९ |
| अहमदनगर | ३४.५ | २२.३ |
| अकोला | ३७.८ | २५.६ |
| अमरावती | ३७.९ | २५.४ |
| बीड | ४१ | २६.३ |
| भंडारा | ३८.४ | २४.४ |
| बुलढाणा | ३१.४ | १८ |
| चंद्रपूर | ४१.२ | २६.४ |
| चेन्नई | ३६.१ | २६.७ |
| नवी दिल्ली | ३१.२ | १९ |
| धुळे | ३७.८ | २५.२ |
| गोंदिया | ३६.२ | २४.४ |
| जळगाव | ३९.१ | २४.१ |
| कोल्हापूर | ३५.८ | २४.४ |
| लातूर | ३५.८ | २४.५ |
| मुंबई | ३४.५ | २९ |
| नागपूर | ३७.९ | २४.१ |
| नांदेड | ३८.२ | २६.३ |
| नंदूरबार | ३५.४ | २३.५ |
| नाशिक | ३५.२ | २२.७ |
| पुणे | ३३.२ | २१.७ |
| पंढरपूर | ३८ | २५.६ |
| सातारा | ३५.४ | २२.६ |
| सांगली | ३७.२ | २४.८ |
| सोलापूर | ३७.६ | २६.१ |
| वर्धा | ३९.१ | २४.९ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया.

**तुळ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:दक्षिण चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल.

**मिथुन :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व लाभ व मान–सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता.

**धनु :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा.

**कर्क :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे.

**मकर :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पूर्व काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता.


**सिंह :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पूर्व सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल.

**कुंभ :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील.

**मीन :** शुभ रंग: हिरवा शुभ दिशा: पश्चिम स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. चिंता करण्याची काळजी नाही.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०६



### आडवे शब्द

१. शाब्दिक हजामत
५. बोकड
७. वर्षा ऋतू
१०. व्यवस्थित
११. खंदक
१२. कल्याणकारी सल्ला
१३. तालासुराचे एकत्र येणे
१४. राघूची जोडीदार
१५. समोरासमोरची चकमक
१६. खानेसुमारी
१८. कापड कापण्याचे साधन
१९. जमीन, पृथ्वी
२०. लोकनाट्यातील कलाकार
२३. विशेष
२५. खर्चाच्या विरुद्ध
२७. बोबडी वळणे
२९. न आवडणाऱ्या व्यक्तीतील चांगले गुणही वाईट भासतात (ला.)
३३. पृथ्वी
३५. शरीर
३६. मराठी भाषते या दोन अक्षरांपासून सुरू होणारा एकही शब्द नाही
३८. कालावधी
३९. नादी लागणे
४१. उद्याच्या नंतरचा दिवस
४३. मृत्यू नसलेला
४५. क्रिकेटमधील धाव
४६. शेवटचे दोन पांडव
४९. पुष्परस
५०. जनन
५१. ढीग
५३. पावाबरोबरचा खाद्यपदार्थ
५४. माराची उमटलेली खूण
५५. जयपराजय
५७. रात्री चमचमणारा कीटक
५८. सणांचा मराठी महिना
५९. केस कापणे
६१. सीतेचा एक पुत्र
६५. घाबरणे
६७. मोठी टोपली
६९. शर्करा
७१. बांबू
७३. हार, सर
७४. राष्ट्रगीताची सुरूवात
७६. ठाणवाई
७८. बाळाचा पाण्याचा शब्द
७९. रसाळ, तजेलदार
८२. एकरूप, रममाण
८३. कामदेव
८४. कसोटी

### उभे शब्द

१. श्रीमंत, धनवान
२. नारळाचे झाड
३. मांडणी
४. पोटाचा असल्यास चिंतेचे कारण!
५. पुष्कळ
६. सततचे नामस्मरण
७. बंधन
८. माल
९. सामन्यातील पराक्रमी खेळाडू
१२. बर्फ
१३. आंदोत्सवाचा दिवस
१४. दोस्ती
१६. अटीची भाषा
१७. अदृश्य
१८. कूर्म
२१. आत्या
२२. गाणे
२३. भोजनालय
२४. आघाडी, एकजूट
२५. वतनदार
२६. कच्चे मडके?
२८. वाढलेला व्याप, अस्ताव्यस्त सामान
३०. नगाऱ्याचा आवाज
३१. चैतन्य, प्रोत्साहन
३२. थंड झाल्यावर पदार्थाचे आकसणे, आकुंचन पावणे
३४. नवरामुलगा
३७. लहान चणीचा
४०. सिंह
४१. दुर्दशा
४२. खास कोकणी द्विदल धान्य
४३. खालचा ओठ
४४. चित्रपट
४७. आरास
४८. सुबक अक्षर
४९. थोर, मोठा
५२. प्रश्न
५६. प्राण
६०. मवाळ धोरण
६२. वागणूक
६३. चप्पल
६४. दरी
६६. वेदनेची तिडीक
६८. श्रीरामाचे स्तोत्र कवच
७०. दर्यावर्दी
७१. शिखराचे टोक
७२. वाळवी
७४. अलीकडेच सुनामीच्या तडाख्यात सापडलेला देश
७५. धमनी
७७. चामखीळ
७८. पाय
८०. जाड दोर
८१. सरोवर, तडाग

### जम्बो शब्दकोडे क्र. ९०५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.हलवाई ३.कडबा ५.वाजतगाजत ९.कोस ११.लवाद १३.पाल १४.रसवान १७.तमासगीर १९.सफर २१.दार २२.रसातल २४.अज २६.डहाळी २७.तेनसिंग २८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज ३६.कवन ३७.तार ३८.दणका ३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह ४५.मलमल ४८.वातड ४९.का ५१.मोकळाढाकळा ५३.वाटा ५४.सावकाश ५५.क्षमा ५६.समाधान ५७.आरसा ५८.लव ६०.कलप ६१.लगाम ६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर ६८.मानधन ७०.तारका ७२.नस ७४.मौन ७६.सदनिका ७८.मद ७९.रकमपात ८०.रडतराऊत

उभे उत्तर : १.हजारदा २.वानवा ४.बालगीत ५.वाद ६.तपास ७.गालफड ८.तथ्य १०.सतत १२.वार १५.सरतेशेवटी १६.नरसिंह १८.मालदार २०.रहाटगाडगे २३.सागर २४.अधोवदन २५.जप २९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द ३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष ४०.धमक ४२.वडवानल ४४.हताश ४५.लढाई ४७.लळा ४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या ५२.कमालकिमान ५४.सार ५६.सलगता ५७.आमरस ५९.वतन ६३.गर ६५.भान ६६.मुकादम ६९.धडक ७१.रस ७२.नकार ७३.मदत ७४.मौज ७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



## महिंद्रा एक्सेलन्स इन थिएटर अवॉर्ड्स २०२६ मध्ये महाराष्ट्राची दैदिप्यमान कामगिरी

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

महिंद्रा ग्रुपतर्फे आयोजित आणि 'टीमवर्क आर्ट्स'द्वारे निर्मित 'महिंद्रा एक्सेलन्स इन थिएटर अवॉर्ड्स' (META) २०२६ च्या २१व्या आवृत्तीचा समारोप नवी दिल्लीतील कमानी ऑडिटोरियममध्ये दिमाखदार सोहळ्यात झाला. या प्रतिष्ठित राष्ट्रीय रंगभूमी महोत्सवात महाराष्ट्राने विविध गटांमध्ये उल्लेखनीय यश मिळवत आपली ठळक छाप पाडली. यंदाच्या पुरस्कारांमध्ये 'मिथ्यासुर' या नाटकाने सर्वोत्कृष्ट निर्मिती आणि सर्वोत्कृष्ट मूळ स्क्रिप्ट हे दोन महत्त्वाचे पुरस्कार पटकावले. यासोबतच साहिल अहुजा यांना सहायक भूमिकेतील सर्वोत्तम अभिनेत्याचा सन्मान मिळाला. 'समथिंग लाईक ट्रुथ'साठी मुख्य भूमिकेतील सर्वोत्तम अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला, तर 'चांदनी रातें' या नाटकासाठी कैझाद घेरडा यांना ध्वनी व संगीत रचनेचा पुरस्कार मिळाला. तसेच 'करुणाष्टके'साठी आशिष देशपांडे यांना वेशभूषा रचनेत सन्मानित करण्यात आले. १९ ते २५ मार्च २०२६ दरम्यान पार पडलेल्या या महोत्सवात देशभरातील २० राज्यांमधून, १०० हून अधिक शहरांतून आणि ६० भाषांमधून आलेल्या विक्रमी ४२२ नोंदींपैकी अंतिम १० नाटकांची निवड करण्यात आली होती. या नाटकांनी भारतीय रंगभूमीतील वैविध्य, सर्जनशीलता आणि समकालीन विषयांचे प्रभावी चित्रण सादर केले. या सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि नाट्यकर्मी अमोल पालेकर यांना भारतीय रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल 'मेटा जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय रंगभूमी अधिक सजीव, प्रयोगशील आणि व्यापक झाली असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. सोहळ्यादरम्यान 'ताल फ्राय' या सांगीतिक सादरीकरणाने वातावरणात रंगत आणली. विविध वाद्यांच्या संगमातून सादर झालेल्या या कार्यक्रमाने भारतीय संगीत परंपरेची समृद्धता अधोरेखित केली. महिंद्रा अँड महिंद्राचे उपाध्यक्ष जय शाह यांनी 'मेटा २०२६' हा भारतीय रंगभूमीतील सर्जनशीलतेचा उत्सव असल्याचे सांगितले. तर 'टीमवर्क आर्ट्स'चे व्यवस्थापकीय संचालक संजोय के. रॉय यांनी हा महोत्सव कलाकार, प्रेक्षक आणि नाट्यकर्मी यांच्यातील संवादाचे प्रभावी व्यासपीठ असल्याचे नमूद केले.

> या महोत्सवातून भारतीय रंगभूमीची विविधता, ताकद आणि सर्जनशीलता अधोरेखित झाली असून, महाराष्ट्राने मिळवलेल्या यशामुळे राज्याच्या नाट्यपरंपरेचा मान आणखी उंचावला आहे.

# सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते विभागप्रमुखांचा गौरव

**पुणे (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात महसूल वसुलीमध्ये उल्लेखनीय कामगिरी नोंदवली असून विविध विभागांनी विक्रमी उत्पन्न प्राप्त केले आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल आज झालेल्या स्थायी समिती सभेत विभागप्रमुखांचा स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या वाढीव उत्पन्नामुळे महापालिकेच्या आर्थिक स्थितीत मोठी बळकटी आली असून शहराच्या विकासाचे चक्र अधिक वेगाने धावणार आहे, असा विश्वास सभापती अभिषेक बारणे यांनी यावेळी व्यक्त केला.



या सन्मान सोहळ्याप्रसंगी स्थायी समिती सदस्य शालिनी गुजर, मनीषा चिंचवडे, सारिका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, अर्चना करांडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन, सविता आसवानी, शीतल वर्णेकर, संतोष कोकणे, विकास साने, सुलभा उबाळे यांसह नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या करसंकलन व करआकारणी विभागाने यंदा सर्वाधिक ९६१ कोटी रुपयांची वसुली केली आहे. त्यापाठोपाठ बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने ६७६ कोटी रुपये, पाणीपुरवठा विभागाने ८० कोटी ७४ लाख रुपये, आकाशचिन्ह व परवाना विभागाने २१ कोटी ५० लाख रुपये आणि झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने १ कोटी १० लाख रुपयांचे उत्पन्न प्राप्त केले आहे. या प्रभावी कामगिरीबद्दल सभापतींनी सहशहर अभियंता सुनील बागवानी, उप आयुक्त सचिन पवार, राजेश आगळे, अण्णा बोदडे, सीताराम बहुरे, पंकज पाटील, व्यंकटेश दुर्वास आणि मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे यांचे विशेष अभिनंदन केले व महसूल वाढीची ही कामगिरी कायम राखण्याचे आवाहन केले.

दरम्यान, आजच्या स्थायी समिती बैठकीत शहरातील विविध विकासकामांना आणि विभागनिहाय प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये प्रभाग क्र. ८ मधील एमआयडीसी एस ब्लॉक, सेक्टर क्रमांक ९, ११, १२, १३ व इतर ठिकाणच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे, प्रभाग क्र. ८ मधील सेक्टर १ ते ४ मधील किरकोळ देखभाल दुरुस्तीची स्थापत्य विषयक कामे करणे, प्रजिमा ३१ रस्त्यावरील आवश्यक रोड फर्निचरची व इतर स्थापत्य कामे करणे, तसेच महापालिकेची रुग्णालये आणि दवाखान्यांसाठी लागणारी आवश्यक औषधे व साहित्य खरेदी करणे अशा महत्त्वाच्या विषयांचा समावेश आहे.

प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सांघिक प्रयत्नांमुळे महापालिकेच्या उत्पन्नात मोठी वाढ झाली आहे.

हे वाढीव उत्पन्न शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा पुरवण्यासाठी मैलाचा दगड ठरेल. आज मंजूर करण्यात आलेल्या विकासकामांमुळे शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम होणार असून नागरिकांना याचा मोठा लाभ मिळेल.



## खाजगी विमा कंपन्यांकडून दावे फेटाळण्याचे प्रमाण अन्यायकारक

खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याकडून संसदेत लक्षवेधी; सक्षम यंत्रणा व नियमन प्रभावी करण्याची मागणी

**पुणे (दै. संध्या)**

खाजगी आरोग्य विमा कंपन्यांकडून दावे उशिरा निकाली काढणे किंवा अन्यायकारकपणे फेटाळणे याचे प्रमाण वाढत असून, यामुळे सर्वसामान्य पॉलिसीधारकांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, अशी गंभीर बाब राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांनी लक्षवेधीद्वारे संसदेत मांडली आहे. प्रा. डॉ. कुलकर्णी यांनी नमूद केले की, खाजगी विमा कंपन्या कॅशलेस उपचार व तत्काळ दावा निकाली काढण्याचे आश्वासन देतात. मात्र प्रत्यक्षात वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत अनेक कुटुंबांना दावा अंशतः मंजूर होणे, विलंब होणे किंवा विविध तांत्रिक कारणांवरून नाकारणे अशा अडचणींना सामोरे जावे लागते. पूर्वअस्तित्वातील आजार, कागदपत्रांतील त्रुटी किंवा धोरणातील अटी यांचा आधार घेत दावे फेटाळले जात असल्याचे त्यांनी सांगितले. इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडियाच्या (आयआरडीएआय) वार्षिक अहवालानुसार २०२४-२५ या कालावधीत विमा क्षेत्रात सुमारे २.५७ लाख तक्रारी नोंदविण्यात आल्या असून, त्यापैकी सुमारे १.२२ लाख तक्रारी या दावा निकाली काढण्यासंदर्भातील आहेत. यामध्ये आरोग्य विम्याचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दावे निकाली काढताना विलंब, वारंवार कागदपत्रांची मागणी आणि दीर्घ पडताळणी प्रक्रिया यामुळे रुग्ण व रुग्णालयांना अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेकदा रुग्ण कॅशलेस सुविधेच्या अपेक्षेने रुग्णालयात दाखल होतात; मात्र डिस्चार्जच्या वेळी दावा निकाली न निघाल्याने कुटुंबियांना मोठी रक्कम उभी करावी लागते. यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक व मानसिक ताण वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर डॉ. कुलकर्णी यांनी केंद्र सरकारने विमा क्षेत्रावरील नियामक नियंत्रण अधिक कडक करावे, अन्यायकारक दावे फेटाळणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली. तसेच रुग्णालयांशी समन्वय साधण्यासाठी स्वतंत्र दावा व्यवस्थापक नेमावेत, पॉलिसीच्या अटींची विक्रीपूर्व पारदर्शक माहिती देणे बंधनकारक करावे आणि सर्व तक्रारी ३० दिवसांच्या निश्चित कालमर्यादेत निकाली काढण्याची व्यवस्था करावी, असेही त्यांनी सुचविले.

## आदिश जैन फाउंडेशनच्या वतीने ज्येष्ठ समाजसेविका ममता सपकाळ यांना कार्यगौरव हा २०२६ पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. संध्या)**

आदिश जैन फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कार्य आणि साहित्य यासाठी समर्पित असलेला कार्यगौरव हा २०२६ सालचा पुरस्कार ज्येष्ठ समाजसेविका आणि गझलकारा ममताताई सपकाळ यांना प्रदान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक म. भा. चव्हाण गझलकार सुधीर मुळीक तसेच ॲडव्होकेट व समाजसेविका प्रार्थना सदावर्ते, संस्थेच्या अध्यक्षा मृणाल जैन उपस्थित होते. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल आणि रोख रक्कम देऊन ममता सपकाळ यांचा सन्मान करण्यात आला.



ज्येष्ठ साहित्यिक म. भा. चव्हाण म्हणाले, स्त्रियांचे पूजन करून अघोरी प्रकार केले जात असतील, तर ते किती वाईट आहे, याचा समाजाने विचार करणे गरजेचे आहे. स्त्रियांना आरक्षण दिले नाही तरी चालेल; मात्र त्यांना संरक्षण देणे अत्यावश्यक आहे. स्त्रियांनी सार्वजनिक ठिकाणी निर्भयता बाळगली पाहिजे आणि एकमेकींना सहकार्य केले पाहिजे. समाज अजूनही स्त्रियांप्रती संवेदनशील झालेला नाही. एखाद्या धर्मग्रंथात स्त्रियांचा अवमान असेल, तर तो इंद्रायणी नदीत बुडवण्याऐवजी गटारात फेकला पाहिजे. रडायला नको, लढायला शिकवा. पुरुषांकडून आता क्रांतीची अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही, असे मत यांनी व्यक्त केले.

संस्थेच्या अध्यक्षा मृणाल जैन यांनी संस्थेची उद्दिष्टे स्पष्ट करत, मागील सहा महिन्यांतील कामगिरीचा आढावा घेतला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर वैष्णवी पाटांगणकर यांनी सरस्वती वंदना सादर केली. नीलिमा फाटक यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रार्थना सदावर्ते यांनी मानपत्राचे वाचन केले.

यानंतर दुसऱ्या सत्रात महिला गझल मुशायरा रंगला. प्रभा सोनवणे, सुनीती लिमये, सुजाता पवार, स्वाती यादव, वैशाली माळी आणि नीलिमा फाटक या ज्येष्ठ गझलकारांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांची मनं जिंकली. ममताताई सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या मुशायऱ्याचे सूत्रसंचालन राजश्री सोले यांनी केले.

कार्यक्रमाला ज्येष्ठ कवयित्री ज्योत्स्ना चांदगुडे, स्वाती सामक, प्रमोद खराडे, सुरेश शेठ आदी मान्यवर उपस्थित होते. शेवटी वैष्णवी पाटांगणकर यांनी आभार प्रदर्शन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कोठारी बिल्डरविरोधात भर उन्हात सदनिकाधारकांचे धरणे आंदोलन

- आमदार बापूसाहेब पठारे यांचा पाठिंबा
- दहा दिवसात घराचा ताबा मिळाला नाही, तर आत्मदहन करण्याचा इशारा

पुणे (दैनिक संध्या) : निर्धारित वेळेत घराची ९५ टक्के रक्कम देऊनही गेल्या दोन वर्षांपासून घराचा ताबा दिला जात नाही. याबाबत महारेरा आणि पोलीस प्रशासनाकडे दाद मागितली असता, कारवाई करण्यात टाळाटाळ होत आहे. कष्टाच्या पैशातून हक्काचे घर घेण्याचे स्वप्न पाहत कोट्यवधी रुपये दिले, मात्र पदरी निराशा आणि बेघर होऊन जगण्यापलीकडे काही लागलेले नाही. यामुळे खराडी येथील व्हर्टीलास को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीतील १०० हून अधिक सदनिकाधारकांनी आपल्या हक्काच्या घरासाठी भर उन्हात बुधवारी धरणे आंदोलन केले. दहा दिवसांत आम्हाला घराचा ताबा मिळाला नाही, तर आम्ही आत्मदहन करू किंवा इमारतीवरून उडी मारून जीव देऊ, असा निर्वाणीचा इशारा आंदोलकांनी यावेळी दिला. आमदार बापूसाहेब पठारे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पीडितांशी संवाद साधला. तसेच खराडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत कारवाई करण्याची मागणी केली. सदनिकाधारकांनी मांडलेल्या समस्या आणि त्यांच्या अडचणी काळजीपूर्वक ऐकून घेत, पठारे यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला केल्या. इतक्या वर्षांपासून नागरिकांना न्यायासाठी संघर्ष करावा लागणे ही अत्यंत गंभीर बाब आहे आणि याकडे दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असे ते म्हणाले. आपण सदनिकाधारकांसोबत असून, त्यांना त्यांच्या हक्काच्या घराचा ताबा मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे सांगत त्यांनी आंदोलनकर्त्यांना धीर दिला. 'व्हर्टीलास सोसायटी'चे चेअरमन किशोरकुमार इंदुरे म्हणाले, "बिल्डर अरमान कोठारी आणि सिद्धांत कोठारी यांनी जुलै २०२४ मध्ये घराचा ताबा मिळेल, असे सांगितले होते. त्यासाठी जबरदस्तीने आमच्याकडून ९५ टक्के पेमेंट वसूल करून घेतले. मात्र, दिलेल्या मुदतीला दोन वर्षे उलटून गेले, तरी अजून ताबा मिळाला नाही. जवळपास १३० सदनिकाधारकांनी प्रत्येकी १.४० कोटी रुपये याप्रमाणे २०० कोटींपेक्षा अधिक रक्कम भरलेली असतानाही प्रकल्प अपूर्ण ठेवण्यात आला आहे. याप्रकरणी अनेकवेळा महारेरा, तसेच पोलीस प्रशासनाकडे पाठपुरावा केला. मात्र, कोणतीही ठोस कारवाई होत नाही. उलट पोलिसांकडून आम्हालाच दरडवण्यात येत आहे. हा केवळ निष्काळजीपणा नसून, मोठ्या प्रमाणावर फसवणूक आणि २०० कोटींपेक्षा अधिक मोठा आर्थिक घोटाळा असल्याचे वाटत आहे."

### तीव्र पाणीटंचाई; ढिसाळ कारभार, निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

पुणे (दैनिक संध्या) : बेजबाबदार अधिकारी आणि ताळमेळ नसलेला पाणीपुरवठा विभाग यामुळे पाणी उपलब्ध असूनही विमाननगरला पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणीटंचाईची झळ सुमारे 60 सोसायट्यांना बसत आहे. या कृत्रिम पाणीटंचाईला जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून निलंबित करण्याची मागणी होऊ लागली आहे. विमाननगर परिसराला भामा आसखेड प्रकल्पातून पुरेसा पाणी पुरवठा होतो. मात्र पाणी वितरणातील त्रुटींमुळे आणि नियोजन नसल्यामुळे मागील अनेक दिवसांपासून या भागाला अनियमित, कमी दाबाने , असमान पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे विमाननगरसाठी टँकर पुन्हा सुरू करण्याची नामुष्की पुणे महानगरपालिकेवर आली आहे. नळाला पाणी आले नाही, हे सांगण्यासाठी अधिकाऱ्यांना संपर्क केल्यावर अनेकदा अधिकारी फोन घेत नाहीत. उडवाउडवीची उत्तरे देतात. एकमेकांकडे बोट दाखवतात, असा अनुभव नागरिकांना येत आहे. उद्यापर्यंत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास यमुना नगर आणि म्हाडा कॉलनी परिसरातील महिला हंडा मोर्चा काढणार आहेत.

## पुण्यात पहिले सर्वसमावेशक 'सेंटर ऑफ एक्सलन्स' सुरू




**पुणे (दै. संध्या)**

हिराबाई कावसजी जहांगीर मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (एचसीजेएमआरआय) आणि बजाज फिनसर्व्ह सीएसआर यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात टाइप-१ डायबेटीससाठी पहिले सर्वसमावेशक 'स्वीटलिंग्स सेंटर ऑफ एक्सलन्स' सुरू करण्यात आले आहे. जहांगीर हॉस्पिटलसमोरील सोहराब हॉल परिसरात उभारलेले हे अत्याधुनिक केंद्र मुलांच्या डायबेटीस उपचारांसाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. टाइप-१ डायबेटीस हा प्रामुख्याने लहान मुले आणि तरुणांमध्ये आढळणारा ऑटोइम्यून आजार असून, शरीर इन्सुलिन तयार करू शकत नसल्यामुळे रुग्णांना नियमित इन्सुलिन घ्यावे लागते. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातच २० वर्षांखालील सुमारे २० हजारांहून अधिक मुले या आजारासोबत जगत असल्याचा अंदाज आहे. 'बजाज फिनसर्व्ह'च्या सीएसआर सुकाणू समितीच्या अध्यक्षा शेफाली बजाज यांनी सांगितले की, "टाइप-१ डायबेटीससाठी सातत्यपूर्ण आणि सर्वसमावेशक उपचारांची सुविधा अद्याप मर्यादित आहे.

## वैशाली कांबळे, मानसी देशपांडे यांना पुणे सार्वजनिक सभेचे पुरस्कार प्रदान

*पुणे सार्वजनिक सभेच्या १५६ व्या वर्धापन दिनानिमित्त रमाबाई रानडे आणि आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा*

**पुणे (दै. संध्या)**

पुणे : पुणे सार्वजनिक सभेच्या १५६ व्या वर्धापन दिनानिमित्त रमाबाई रानडे पुरस्कार व आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचा रमाबाई रानडे पुरस्कार सोलापूर जिल्ह्यातील श्रीमंत बाजीराव पेशवा सैनिकी विद्यालयाच्या वैशाली आबासाहेब पेठे कांबळे यांना, तर आदर्श शिक्षक पुरस्कार अहिल्यादेवी प्रशालेच्या मानसी देशपांडे यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा बुधवार पेठेतील पुणे सार्वजनिक सभेच्या सभागृहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष विद्याधर



नारगोलकर, कार्याध्यक्ष अनिल शिदोरे, उपाध्यक्ष अरविंद नवरे, धनाजी चन्ने, विमल भालेराव, कार्यवाह शरद गर्भे, सहकार्यवाह सुभाष कुलकर्णी, कोषाध्यक्ष सुरेश कालेकर, विजय मराठे, कार्यकारी सदस्य वसंत जोशी, सुरेश भावे, अंजली वैद्य, शाहीर हेमंत राजे मावळे, बाळ भिंगारकर उपस्थित होते. सन्मानचिन्ह, शाल, रोख रक्कम आणि पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. डॉ. मिलिंद भोई म्हणाले, आजच्या काळात सकारात्मकतेपेक्षा नकारात्मकता सर्वत्र अधिक दिसून येते. जोपर्यंत आपण सकारात्मकता वाढवत नाही, तोपर्यंत नकारात्मकता कमी होणार नाही. शिक्षकांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षण व्यवस्थेवर आघात झाला, तर देशाचे भवितव्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे शिक्षण जितके आवश्यक आहे, तितकेच संस्कारही महत्त्वाचे आहेत. समाजाला केवळ मंदिरांची नव्हे, तर उत्तम शाळांची गरज आहे.

अनिल शिदोरे म्हणाले, समाजामध्ये अनेक व्यक्ती आपल्या क्षमतेनुसार निस्वार्थपणे कार्य करत असतात. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा, यासाठी पुरस्कारांचे आयोजन केले जाते. विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सभेने केले आहे. सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या उद्देशाने सार्वजनिक सभेची स्थापना करण्यात आली. काळानुरूप संस्थेमध्ये बदल झाले, तरी तिची मूलभूत तत्त्वे मात्र कायम अबाधित राहिली आहेत.

# 'जगद्धात्री'च्या आगामी भागात पोलिसांच्या निर्भयपणाच्या जिद्दी वृत्तीवर प्रकाश!

**पुणे (दै. संध्या)**

'जगद्धात्री' ही मालिका आपल्या रोमांचक वळणांमुळे आणि उच्च तणावाच्या नाट्यामुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे. होळीच्या विशेष भागात झालेल्या धक्कादायक घटनेत शिवायवर निर्दयीपणे गोळी झाडली गेल्याने चाहत्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. कथानक पुढे सरकत असताना जगद्धात्री या प्रकरणाचा मागोवा घेऊ लागते आणि आपल्या टीमसह या हल्ल्याचा मास्टरमाइंड कोण आहे हे शोधण्याच्या मिशनवर निघते.

तिला कळते की शिवायवर गोळी झाडण्यामागे रुद्रचा हात आहे. न्याय मिळवण्यासाठी निर्धाराने जगद्धात्री स्वतः पुढाकार घेते आणि त्याला शिक्षा देण्यासाठी सज्ज होते. यामुळे प्रेक्षकांना चकित करणारा एक जोरदार आमनासामना पाहायला मिळणार आहे. या ट्रॅकमध्ये पोलिसांची खरी जिद्द आणि



आत्मा प्रभावीपणे दाखवण्यात आला आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी ते हार मानत नाहीत आणि न्याय व सत्यासाठी सतत, अखंडपणे लढत राहतात. आगामी ट्रॅक आणि पोलिसांच्या जिद्दीबद्दल बोलताना सोनाक्षी बत्रा म्हणाली, "आगामी भाग खूपच तीव्र आणि भावनिक असणार आहेत. जगद्धात्री ही सत्य आणि न्यायासाठी ठामपणे उभी राहणारी व्यक्ती आहे आणि यावेळी हे तिच्यासाठी अत्यंत वैयक्तिक झाले आहे. रुद्रबद्दलचे खरे सत्य समजताच तिचा एकमेव उद्देश असतो की त्याने जे केले त्याची त्याला योग्य शिक्षा मिळायला हवी. या ट्रॅकमध्ये पोलिस अधिकाऱ्यांची ताकद आणि आत्मा ठळकपणे दिसतो. परिस्थिती कितीही कठीण असली तरी ते नेहमीच उभे राहतात आणि योग्य गोष्टीसाठी लढत राहतात. धोका समोर असला तरी ते कर्तव्याला प्राधान्य देतात आणि अनेकदा जीवाची पर्वा न करता सत्य आणि न्यायासाठी झटत राहतात. जगद्धात्रीसारख्या एका पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारताना मला हा अत्यंत विनम्र अनुभव आला. आपल्या पोलिस दलातील धैर्य, जिद्द आणि निस्वार्थपणा यांची खरी जाणीव मला यामुळे झाली. जगद्धात्री ही त्याच निर्भय, निर्धाराने भरलेली आणि योग्य गोष्ट करण्यासाठी कटिबद्ध आत्म्याचे प्रतीक आहे. जरी काल्पनिक असली तरी अशा धाडसी अधिकारीची कथा साकारण्याची संधी मिळाल्याचा मला प्रचंड अभिमान आणि सन्मान वाटतो. मला मनापासून आशा आहे की या मालिकेतून आम्ही त्यांच्या जबाबदारीचे योग्य चित्रण करू शकू."

फर्मान हैदर पुढे म्हणाला, "या नाट्यमय वळणामुळे कथेतील सर्वकाही बदलणार आहे. शिवायला गोळी लागणे ही मोठी घटना आहे पण तो आणि जगद्धात्री हे सगळं कसं हाताळतात हे त्याहूनही महत्त्वाचे आहे. हे पोलिसांच्या खऱ्या जिद्दी आत्म्याचे प्रतीक आहे. जीवघेण्या परिस्थितीला सामोरे गेल्यावरही ते कधीच हार मानत नाहीत. उलट अधिक शक्ती, निर्धार आणि धैर्य घेऊन ते इतरांचे रक्षण करण्यासाठी आणि न्याय टिकवण्यासाठी उभे राहतात. अशा पात्राची भूमिका साकारणे माझ्यासाठी अत्यंत समृद्ध करणारा अनुभव ठरला. आपल्या पोलिस दलाचे रोजचे धैर्य, त्याग आणि मानसिक ताकद किती प्रचंड आहे याची मला जाणीव झाली. समाज सुरक्षित ठेवण्यासाठी ते स्वतःला सतत धोक्यात घालतात आणि हे खरोखरच कौतुकास्पद आहे. अशा निर्भय आणि कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याचा हा पैलू पडद्यावर आणण्याची संधी मिळाल्याचा मला अभिमान आणि कृतज्ञता वाटते. प्रेक्षकांनीही या प्रवासाशी जोडले जावे आणि त्याचे महत्त्व जाणावे अशी माझी आशा आहे."

भावनांच्या भरती-ओहोटीचा कल्लोळ आणि जगद्धात्रीच्या मनात पेटलेली बदल्याची आग पाहता ॲक्शन, नाट्य आणि न्यायाने भरलेली ही दमदार कथा प्रेक्षकांसमोर सादर करण्यासाठी ही मालिका सज्ज आहे. अधिक जाणून घेण्यासाठी पहा 'जगद्धात्री' मालिका दररोज रात्री 10 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अवकाळी पाऊस आणि गारपीटग्रस्त भागाची युगेंद्र पवार यांच्याकडून पाहणी

बारामती (दैनिक संध्या) : अवकाळी पाऊस बारामती तालुक्याला अक्षरशः झोडपून काढत आहे. पवईमाळ, पणदरे, धुमाळवाडी आणि आसपासच्या परिसरात अवकाळी पाऊस आणि गारपिटीने झालेल्या नुकसानीची युगेंद्र पवार यांनी पाहाणी केली. नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांशी संवाद साधत आणि त्यांना धीर दिला आणि नुकसानीचे पंचनामे करून लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा, करू, अशी ग्वाही त्यांना दिली. वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस आणि काही ठिकाणी होत असलेल्या गारपिटीमुळे ऊसासह अन्य पिके आणि फळबागा भुईसपाट झाल्या असून, अनेक शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. या आसमानी संकटामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. मेहनतीने पिकवलेले उबागे पीक शिवारांत आडवे झाले असून शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे बळीराजा संकटात सापडला असून त्याच्या डोळ्यात आज अश्रू दाटले आहेत. या नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन तातडीने पंचनामे करून त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाच्या माध्यमातून तालुका प्रशासनाला करणार असल्याचे युगेंद्र पवार यांनी यावेळी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे बारामती तालुकाध्यक्ष ॲड. राजेंद्रबापू जगताप यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नुकसानग्रस्त शेतकरी बांधव यावेळी उपस्थित होते.

### “कामगारांच्या हक्कांवर डाका टाकणाऱ्या सरकारचा इंटककडून तीव्र निषेध!”



पुणे (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) यांच्या वतीने दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी "काळा दिवस (ब्लॅक डे)" म्हणून पाळण्यात आला. केंद्र व राज्य सरकारने कामगार विरोधी धोरणे राबविल्याच्या निषेधार्थ हा आंदोलनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व इंटकचे राष्ट्रीय अध्यक्ष जी. संजीव रेड्डी व महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) चे प्रदेशाध्यक्ष कैलास भाऊ कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या प्रसंगी पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना निषेधाचे निवेदन सादर करण्यात आले. पुणे जिल्हा इंटकचे जिल्हाध्यक्ष विजय जाधव यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हे निवेदन दिले. यावेळी विजय जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चेदरम्यान सविस्तरपणे हा "काळा दिवस" का पाळण्यात येत आहे, तसेच कामगार संघटनांच्या वतीने या आंदोलनामागील भूमिका आणि कारणे यांची सखोल माहिती निवेदनाच्या माध्यमातून स्पष्ट केली. कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हे आंदोलन अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. ही बाब या आंदोलनाची विशेष ठरली. केंद्र सरकारने दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी कामगार हिताचे तब्बल २९ कायदे रद्द करून त्याऐवजी चार नवीन श्रम संहिता (काळे कायदे) लागू केले. या निर्णयामुळे कामगारांच्या हक्कांवर गदा येत असून, त्यांच्या सुरक्षिततेवर व भविष्यावर परिणाम होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या आंदोलनाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये महिला इंटक अध्यक्षा शितल कोतवाल, पुणे जिल्हा इंटक कार्याध्यक्ष शंकर जाधव, उपाध्यक्ष गोविंदराव अटक, संग्राम जाधव, प्रवक्ते धनंजय माळवे तसेच दगडू पवार, पोपटराव चौगुले, श्री विटकर, अनिल लगस, सचिव प्रकाश सावंत व सचिन गोंडे आदी मान्यवर उपस्थित होते. या आंदोलनाच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारने कामगार विरोधी निर्णय तात्काळ मागे घ्यावेत, अन्यथा भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

### ठाणे जिल्ह्याची सुरक्षा होणार अधिक दमदार



भिवंडी (दैनिक संध्या) : नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात १ एप्रिल ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत 'परिचय सराव कार्यक्रम' (Familiarization Exercise Program) आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) यांच्या संयुक्त विद्यमाने राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे. या सराव कार्यक्रमासाठी एनडीआरएफ आणि एसडीआरएफचे एकूण २५ अनुभवी अधिकारी व कर्मचारी ठाणे जिल्ह्यात दाखल झाले आहेत. यामध्ये १ राजपत्रित अधिकारी (GO), २ दुय्यम अधिकारी आणि २२ अन्य पदांच्या जवानांचा समावेश आहे. ही तुकडी जिल्ह्यातील विविध महानगरपालिका क्षेत्रांत आणि ग्रामीण भागात जाऊन स्थानिक यंत्रणेला प्रशिक्षित करणार आहे.

# आईकू १५ एपेक्स रंगात लॉन्च, बेस्ट-इन-क्लास २ केडिस्प्लेसह

नवी दिल्ली (दै. संध्या) :



आईकू या हाय-परफॉर्मन्स स्मार्टफोन ब्रँडने आज आईकू 15 एपेक्स लॉन्च केल्याची घोषणा केली आहे. हा फ्लॅगशिप आईकू 15 चा नवीन कलर व्हेरिएंट आहे. आईकू 15 च्या यशावर आधारित, एपेक्स व्हेरिएंट आकर्षक डिझाइनसह फ्लॅगशिप अनुभव अधिक उंचावतो आणि परफॉर्मन्स व ॲडव्हान्स्ड डिस्प्ले इनोव्हेशनमध्ये आईकू ची आघाडी मजबूत करतो.

आईकू 15 एपेक्स आपल्या बोल्ड आणि आकर्षक डिझाइनमुळे वेगळी ओळख निर्माण करतो. “एपेक्स” म्हणजे सर्वोच्च स्तराची संकल्पना—जी ताकद, अचूकता आणि आत्मविश्वास दर्शवते. याच्या बॅक पॅनेलमध्ये इंडस्ट्री-फर्स्ट डायनॅमिक पार्टिकल डिझाइन आणि लेझर होलोग्राफिक टेक्नॉलॉजी दिली आहे, जी प्रकाशानुसार बदलत 3D सारखा फ्लुइड इफेक्ट देते, त्यामुळे फोन अधिक जिवंत वाटतो.

इंडस्ट्रीतील उत्कृष्ट सॅमसंग 2के एम14 लीड™ ओएलईडीपॅनेलसह, आईकू 15 चा डिस्प्ले पारंपरिक एफएचडी+ स्क्रीनपेक्षा जास्त रिझोल्यूशन देतो, ज्यामुळे टेक्स्ट अधिक शार्प, व्हिज्युअल्स अधिक डिटेल्ड आणि कलर अचूकता सुधारते. हाय-ग्राफिक्स गेमिंग, ॲनिमेटेड कंटेंट पाहणे किंवा वाचन—प्रत्येक परिस्थितीत 2के रिझोल्यूशन उत्कृष्ट स्पष्टता देते. भारतातील सर्वात ब्राइट 2600 निट्स एचबीएमआणि 6000 निट्सपर्यंत लोकल पीक ब्राइटनेससह हा डिस्प्ले तेज उन्हातही उत्तम व्हिजिबिलिटी देतो.

आईकू 15 एपेक्सची किंमत 12जीबी + 256जीबीव्हेरिएंटसाठी ₹72,999 (नेट इफेक्टिव ₹66,999) आणि 16जीबी + 512जीबी व्हेरिएंटसाठी ₹79,999 (नेट इफेक्टिव ₹73,999) ठेवण्यात आली आहे. हा स्मार्टफोन 6 एप्रिलपासून आयकू.इन अमेझॉन.इन व्हिवो एक्सक्लूसिव स्टोअर्स, रिलायन्स डिजिटल आणि जवळच्या रिटेल स्टोअर्समध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. आईकू 15 आधीच Alpha आणि Legend एडिशनमध्ये उपलब्ध आहे.

आईकू 15 एपेक्स मध्ये आईकू 15 चे सर्व फ्लॅगशिप फीचर्स कायम ठेवले आहेत. यात भारतातील सर्वात वेगवानस्नॅपड्रॅगन ८ एलिट जेन 5 प्रोसेसर असून, आईकू च्या सुपरकंप्युटिंग चिप Q3 सोबत जोडलेला आहे, ज्यामुळे उत्कृष्ट वेग, कार्यक्षमता आणि इमर्सिव गेमिंग अनुभव मिळतो.

यात 144हर्ट्झॲडॅप्टिव रिफ्रेश रेट आहे, जो स्मूथ स्क्रोलिंग, सीमलेस ट्रान्झिशन आणि उत्कृष्ट गेमिंग अनुभव देतो. ट्रिपल ॲम्बियंट लाइट सेन्सर्स डिस्प्लेची ब्राइटनेस आणि कलर टोन वातावरणानुसार आपोआप समायोजित करतात, ज्यामुळे नेहमी नैसर्गिक आणि आरामदायी व्ह्यूइंग अनुभव मिळतोडॉल्बी व्हिजन सपोर्ट आणिटी यू व्ही ऱ्हाइनलँड सर्टिफाइड आय प्रोटेक्शनमुळे हा स्मार्टफोन सिनेमॅटिक आणि डोळ्यांसाठी सुरक्षित व्हिज्युअल अनुभव देतो.

## दौंडमध्ये एसआरपीएफ भरतीत उत्तेजक पदार्थांचा शिरकाव?

दौंड (दै. संध्या) :

शहरात राज्य राखीव पोलिस दलाच्या (एसआरपीएफ) भरती प्रक्रियेत उत्तेजक पदार्थांचे सेवन केल्याच्या संशयावरून गुरुवारी (ता. २) तीन उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यांच्याकडे संशयास्पद पावडर आणि गोळ्या सापडल्याने ही कारवाई करण्यात आली. एसआरपीएफ गट क्रमांक पाच येथे सशस्त्र पोलिस शिपाई पदाच्या १०४ जागांसाठी भरती सुरू आहे. मैदानी चाचणीदरम्यान तीन तरुणांकडे संशयास्पद पदार्थ आढळले. धावण्याच्या स्पर्धेत सरस कामगिरी करण्यासाठी त्यांनी हे सेवन केल्याचा संशय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. संबंधित उमेदवारांनी मात्र ही केवळ ‘प्रोटिन पावडर’ असल्याचा दावा केला आहे. दौंड पोलिस ठाण्याचे निरीक्षक गोपाळ पवार यांनी सांगितले की, उमेदवारांच्या रक्ताचे नमुने आणि जप्त केलेले पदार्थ प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. सध्या कोणताही गुन्हा दाखल नसून, प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. १०४ जागांच्या या भरतीसाठी २४,४३६ उमेदवारांनी अर्ज केले असून १६ मार्चपासून ही प्रक्रिया सुरू आहे.

## Vivo V70 FE भारतात लॉन्च; 200MP कॅमेरा, 7000mAh बॅटरीसह दमदार फीचर्स

पुणे (दै. संध्या) :




स्मार्टफोन बाजारात स्पर्धा वाढत असताना विवो इंडियाने आपला नवीन प्रीमियम स्मार्टफोन Vivo V70 FE भारतात सादर केला आहे. अत्याधुनिक कॅमेरा, शक्तिशाली बॅटरी आणि आकर्षक डिझाइनमुळे हा फोन मध्यम-उच्च सेगमेंटमध्ये ग्राहकांसाठी एक मजबूत पर्याय ठरणार आहे. या स्मार्टफोनमध्ये 200MP OIS अल्ट्रा-क्लिअर मुख्य कॅमेरा देण्यात आला असून, AI फोटोग्राफी सूटमुळे फोटो अधिक स्पष्ट आणि नैसर्गिक दिसतात. 50MP फ्रंट कॅमेरामुळे ग्रुप सेल्फी देखील उच्च गुणवत्तेत मिळतात. AI मॅजिक वेदर, AI इरेज 3.0, AI लँडस्केप यांसारख्या फीचर्समुळे फोटो एडिटिंग अधिक स्मार्ट झाले आहे. Vivo V70 FE मध्ये 7000mAh बॅटरी आणि 90W फ्लॅश चार्जिंग सपोर्ट आहे, ज्यामुळे फोन दिवसभर सहज चालतो. MediaTek Dimensity 7360-Turbo प्रोसेसर आणि LPDDR5 RAM मुळे मल्टीटास्किंग आणि गेमिंग स्मूथ होते. हा फोन नॉर्दर्न लाइट्स पर्पल आणि मॉन्सून ब्लू रंगांमध्ये उपलब्ध आहे. डार्कनेस ग्लो तंत्रज्ञानामुळे कमी प्रकाशात फोनच्या बॅक पॅनलवर हलकी चमक दिसते. 1.5K OLED डिस्प्ले आणि 120Hz रिफ्रेश रेटमुळे व्हिज्युअल अनुभव अधिक आकर्षक होतो.

**किंमत आणि उपलब्धता**

Vivo V70 FE ची किंमत खालीलप्रमाणे आहे:

8GB + 128GB : ₹37,999
8GB + 256GB : ₹40,999
12GB + 256GB : ₹44,999

हा फोन 9 एप्रिल 2026 पासून ऑनलाइन आणि ऑफलाइन स्टोअर्समध्ये उपलब्ध होणार आहे.

ग्राहकांना बँक कॅशबॅक, EMI पर्याय, एक्सचेंज बोनस, विस्तारित वॉरंटी आणि TWS बंडल ऑफर्सही मिळणार आहेत. Vivo V70 FE हा स्मार्टफोन उत्कृष्ट कॅमेरा, मोठी बॅटरी आणि प्रीमियम डिझाइन यांचा संगम आहे. त्यामुळे फोटोग्राफी प्रेमी आणि दमदार परफॉर्मन्स शोधणाऱ्या ग्राहकांसाठी हा फोन आकर्षक पर्याय ठरू शकतो.

# ‘लिव्ह इट लार्ज’ या नव्या मोहिमेची घोषणा

### रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, बादशाह, सिद्धार्थ मल्होत्रा, नागा चैतन्य आणि पायल धरे यांचा सहभाग

नवी दिल्ली (दै. संध्या) :




सीग्राम्स रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने ‘लिव्ह इट लार्ज’ या नव्या ब्रँड मोहिमेची घोषणा केली. ब्रँडच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा दर्शवणारी ही मोहीम आजच्या पिढीचा ‘जनरेशन लार्ज’चा निर्भय आणि व्यक्त होणारा दृष्टिकोन जिवंत करते, जी यशाच्या मार्गांना नव्याने परिभाषित करण्याचा प्रयत्न करते. या मोहिमेत विविध क्षेत्रांतील सहा आयकॉन्स रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, बादशाह, सिद्धार्थ मल्होत्रा, नागा चैतन्य आणि पायल धरे सहभागी आहेत. प्रत्येक जण ब्रँडच्या ‘लिव्ह इट लार्ज’ तत्त्वज्ञानातील निर्भयता आणि आत्मविश्वास दर्शवतो. ‘लँड ऑफ लार्ज’ या संकल्पनेत साकारलेल्या या मोहिमेचा चित्रपट आधुनिक भारताचा उत्सव साजरा करतो. यात देशभरातील विविध भागांमधून प्रवास करून प्रत्येक प्रदेश आपापल्या सांस्कृतिक दृष्टीकोनातून ‘लार्ज’ कसे जगतो हे दाखवले आहे: उत्तर भारताचा ‘टशन’, दक्षिणेतील तंत्रज्ञान आणि उत्सवांचा संगम, पूर्वेतील संगीत आणि पश्चिमेतील ग्रामीण उत्साह. प्रत्येक क्षण हा ठाम विश्वास व्यक्त करतो की इथे ‘लार्ज’च जगण्याचा मार्ग आहे. हा चित्रपट आधुनिक भारताचे ताजेतवाने, रंगीत आणि सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध चित्रण करतो आणि रॉयल स्टॅगला मोठे स्वप्न पाहण्यासाठी प्रेरणा देणारा ब्रँड म्हणून अधिक मजबूत करतो. या विविध प्रादेशिक उत्सवांद्वारे ही मोहीम ब्रँडचे तत्त्व “यहाँ, बस लार्ज चलता है!” जिवंत करते. हे भारताच्या नव्या पिढीतील असीम ऊर्जा आणि आशावाद दर्शवते, जिथे महत्त्वाकांक्षेचे अनेक रूप आहेत आणि यशाची व्याख्या एकाच मार्गाने होत नाही. रॉयल स्टॅग लाखो लोकांना स्वतःला स्वीकारण्यासाठी, आपल्या मूळांवर अभिमान बाळगण्यासाठी आणि आपल्या स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी प्रेरित करणारा उत्प्रेरक म्हणून आपली भूमिका मजबूत करतो. ही मोहीम टीव्ही, डिजिटल, प्रिंट आणि ओओएच माध्यमांद्वारे 360 अंशांमध्ये मोठ्या प्रमाणावर राबवली जाईल, जेणेकरून ती जनरेशन लार्जपर्यंत प्रभावीपणे पोहोचेल. पर्नोड रिकार्ड इंडिया यांच्या चीफ मार्केटिंग ऑफिसर देबाश्री दासगुप्ता म्हणाल्या, “रॉयल स्टॅगने नेहमीच मोठी स्वप्ने पाहणे, साध्य करणे आणि ‘लिव्ह इट लार्ज’चा उत्सव साजरा केला आहे. आमच्या नवीन मोहिमेद्वारे आम्ही या तत्त्वज्ञानाला पुढे नेत आहोत आजच्या पिढीची ऊर्जा, आवड आणि सांस्कृतिक विविधता यांचे चित्रण करत. विविध क्षेत्र आणि प्रदेशांतील सहा आयकॉन्सना एकत्र आणून आम्ही दाखवत आहोत की ‘लिव्हिंग इट लार्ज’ म्हणजे एका चौकटीत बसणे नाही तर स्वतःचा मार्ग स्वीकारणे आहे. ही मोहीम भारताच्या प्रत्येक कोपऱ्यातील महत्त्वाकांक्षा त्यांच्या सांस्कृतिक दृष्टिकोनातून कशी साजरी केली जाते हे दाखवते. यामुळे ब्रँडच्या परिवर्तनाच्या प्रवासाला आणखी गती मिळेल आणि तो केवळ श्रेणीतील अग्रणी न राहता सांस्कृतिक आयकॉन म्हणून विकसित होईल, जो भारताला मोठे विचार करायला, मोठी स्वप्ने पाहायला आणि ‘लिव्ह इट लार्ज’ जगायला प्रेरित करतो.”

भारतीय क्रिकेटपटू रोहित शर्मा, ज्यांचे व्यवस्थापन राईझ वर्ल्डवाईड करते, म्हणाले, “लिव्ह इट लार्ज हा फक्त एक टॅगलाइन नाही ती एक जीवनदृष्टी आहे. योग्य वेळी पुढे येणे, परिस्थिती प्रतिकूल असली तरी स्वतःवर विश्वास ठेवणे आणि प्रवासातील प्रत्येक क्षणाचा आनंद घेणे याबद्दल आहे. ही मोहीम त्या प्रत्येक व्यक्तीशी जोडली जाते जी आयुष्यात किंवा मैदानावर लहान खेळण्यास नकार देते.”

अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा या भागीदारीबद्दल आपला उत्साह व्यक्त करताना म्हणाले, “रॉयल स्टॅग म्हणजे माझ्या विश्वासाशी जुळणारी गोष्ट नवीन गोष्टी करण्याचे धैर्य आणि ‘लिव्ह इट लार्ज’ जगण्याची प्रेरणा. हा फक्त ब्रँड नाही, तर एक दृष्टिकोन आहे जो आवड, महत्त्वाकांक्षा आणि स्वतःला पुढच्या स्तरावर नेण्याचा उत्सव साजरा करतो. लोकांना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आणि धाडसीपणे जगण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या या प्रवासाचा भाग होऊन मला आनंद होत आहे.” रॅपर बादशाह म्हणाले, “लार्ज जगणे म्हणजे आपण कोण आहोत हे निर्भयपणे स्वीकारणे. तुम्ही कुठून सुरुवात करता यापेक्षा तुमच्यातील आत्मविश्वास आणि मेहनत महत्त्वाची असते. रॉयल स्टॅग हाच विश्वास मांडतो आणि म्हणूनच मला तो आवडतो. आपण एकत्र येऊन वैयक्तिकतेचा उत्सव साजरा करत आहोत आणि लोकांना त्यांच्या पद्धतीने त्यांचा प्रवास करण्यासाठी प्रेरित करत आहोत.”

## विद्यार्थ्यांचा आनंद मेळावा आनंद बाजार उत्साहात साजरा

बारामती (दै. संध्या) :



बारामती नगरपरिषद शाळा,माळेगाव कॉलनी येथे इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा व बाल आनंद मेळावा (आनंद बाजार) उत्साहात साजरा करण्यात आला.बारामती नगरपरिषदेच्या सर्व शाळांमधून सर्वप्रथम शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीचा वर्ग एप्रिल महिन्यात सुरू करण्याचा मान हा माळेगाव कॉलनी शाळेने मिळवला आहे.आत्तापर्यंत जवळपास 20 विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतला आहे. शाळेतील शिक्षकांच्या माहितीनुसार आणखी काही विद्यार्थी पुढील दोन ते तीन दिवसात प्रवेश घेतील असे सांगण्यात आले.नवीन विद्यार्थ्यांचे वाजतगाजत, औक्षण करून प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवर श्री.कृष्णमुर्ती जगताप (अध्यक्ष-शाळा व्यवस्थापन समिति माळेगाव कॉलनी),श्री. कल्याण पाचांगणे (माजी अध्यक्ष-शाळा व्यवस्थापन समिती माळेगांव कॉलनी) व पालकांचा सन्मान करण्यात आला.यानंतर इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत केले,खाऊवाटप व शैक्षणिक शालेय साहित्य वाटप उपस्थितांच्या हस्ते करून प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.शाळेतील विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाची माहिती होण्यासाठी आनंद बाजार या उपक्रमाचे शाळेत आयोजन करण्यात आले होते.परिसरातील पहिली ते सातवीच्या वर्गात शिकणाऱ्या बारामती नगरपरिषद शाळा,माळेगाव कॉलनी येथे आनंद बाजार आयोजित करण्यात आला होता.यावेळी शिक्षक,पालक, विद्यार्थी उपस्थित होते.या आनंद बाजारात विविध खाद्यपदार्थ, भाजीपाला,किराणा,खेळणी आदी वस्तुंची विक्री करण्यात आली. या आनंद बाजारात पालकांनी विद्यार्थ्यांकडून मनसोक्त खरेदी करून विद्यार्थ्यांना व्यवहार कसा करावा याची चालना दिली.या बाजारात 8 ते 10 हजार रुपयांची उलाढाल झाली.हा उपक्रम मुख्याध्यापक सरगर सर यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक पर्वते सर,सहशिक्षिका चौधरी मॅडम,शेंडे मॅडम,जाधव मॅडम,देवकाते मॅडम, जाधव मॅडम,जगताप मॅडम यांच्यासह अंगणवाडी सेविका बडे मॅडम,मदतनीस कोकरे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

# फ्रँकलिन टेम्पलटनतर्फे 'सफायर इक्विटी लाँग-शॉर्ट एसआयएफ'फंडचा शुभारंभ

पुणे (दै. संध्या) :




फ्रँकलिन टेम्पलटन (इंडिया) ने आज स्पेशलाइज्ड इन्व्हेस्टमेंट फंड्स (एसआयएफ) अंतर्गत आपली पहिली योजना सफायर इक्विटी लाँग-शॉर्ट एसआयएफ योजनेचा शुभारंभ करत असल्याची घोषणा केली. एसआयएफ नियमावलींतर्गत आणण्यात आलेली ही योजना इक्विटी लाँग शॉर्ट फंड आहे. हा फंड लार्ज, मिड आणि स्मॉल-कॅप श्रेणीमध्ये वैविध्यपूर्ण गुंतवणूक करण्यासाठी निफ्टी ५०० निर्देशांकातील समभागांमध्ये गुंतवणूक करतो. या फंडाचे मुख्य उद्दिष्ट मार्केटच्या चढ-उतारांमध्ये दीर्घकालीन भांडवलवृध्दी आहे. हा फंड स्वतः विकसित केलेल्या गणितीय आणि आकडेवारीच्या प्रारुपावर आधारित असून त्यात अतिशय विचारपूर्वक समभागांची निवड, गरजेनुसार गुंतवणुकीचे प्रमाण बदलणे आणि गुंतवणुकीतील धोका कमी करण्यासाठी नियमांचे कसोशीने पालन केले जाते. या फंडाचा एनएफओ (न्यू फंड ऑफर) गुंतवणुकीसाठी १० एप्रिल २०२६ पासून खुला होणार असून २४ एप्रिल २०२६ ला बंद होणार आहे.

फ्रँकलिन टेम्पलटन - इंडियाचे अध्यक्ष अविनाश सातवलेकर (Satwalekar) या फंडाच्या शुभारंभप्रसंगी बोलताना म्हणाले, आजचा शेअरबाजार हा खूप वेगाने बदलत चालला असून गुंतवणूकदारांसाठी शिस्तबद्ध आणि लवचिक गुंतवणूक धोरण राबविणे अत्यंत गरजेचे झाले आहे. एसआयएफ फंड्स अधिक जोखीम घेणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी बनविण्यात आलेला असून यामध्ये उच्च परतावा मिळण्याची शक्यता असते आणि हा फंड कर कार्यक्षम देखील आहे. सर्वसामान्य म्युच्युअल फंड आणि एसआयएफमधील सर्वात मोठा फरक म्हणजे हा फंड आपल्या एकूण मालमत्तेच्या २५ टक्क्यांपर्यंतची रक्कम 'शॉर्ट' (बाजार घसरणीची शक्यता) पोझिशन्स उभ्या करण्यासाठी वापरू शकतो. त्यामुळे बाजारातील घसरणीच्या काळात तोट्याचा धोका कमी होण्यास मदत होते.

> “पोर्टफोलिओची उभारणी अतिशय शिस्तबद्ध आणि संशोधनावर आधारित प्रक्रियेद्वारे केली जाते. यामध्ये फंडाची गुंतवणूक टीम रोखता, क्षेत्रनिहाय गुंतवणूक, गुंतवणुकीचा आकार, जोखीम आणि शैली यांसारख्या बाबींचा काळजीपूर्वक विचार करून स्वतःच्या अनुभवाचा आणि निर्णयाचा वापर करते. त्यामुळे पोर्टफोलिओमध्ये कोणताही अनावश्यक कल निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली जाते. खरेदी करताना अथवा विक्री करताना अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने विविध घटकांचा वापर करत हे धोरण अधिक प्रभावीपणे शेअरबाजारातील प्रवाहाला अनुसरून संधी व्यक्त करण्यासाठी तयार करण्यात आलेले आहे. त्यामुळे आव्हानात्मक किंवा घसरणीच्या काळातही अल्फा परतावा (बाजार घसरणीतही चांगला परतावा) सुरक्षित राहू शकणार आहे. आमचे वेगळेपण हे 'डायनॅमिक फॅक्टर इन्साइट्स' आणि 'जोखीम व विविध गुंतवणूकीच्या स्थितीवरील नियंत्रण' यांचा मिलाफ घडवून आणते. त्यामुळे बाजारपेठेतील विविध चढ-उतारांमध्येही स्थिरता राखून विशिष्ट संधींचा लाभ घेणे शक्य होणार आहे.”

ते पुढे म्हणाले की, 'सफायर इक्विटी लाँग-शॉर्ट एसआयएफ हा फंड फ्रँकलिन टेम्पलटनच्या पद्धतशीर आणि सांख्यिकीय गुंतवणुकीतील अनेक दशकांच्या अनुभवावर आधारित आहे. हा फंड समभागांची निवड करण्यासाठी डेटा आधारित तांत्रिक प्रारुपाचा वापर करतो आणि यामध्ये गुणवत्ता, मूल्य, गुतवणूकदारांचा कल, पर्यायी संकेत आदी ४० पेक्षा अधिक घटकांचा विचार केला जातो, तसेच 'शॉर्ट' ची (विक्री) संधी शोधण्यासाठी विशेष तांत्रिक आराखडाही तयार करण्यात आलेला आहे. हा फंड शेअरबाजारातील संधी शोधताना 'लाँग-शॉर्ट' पद्धतीचा वापर करतो. त्यामुळे गुंतवणुकीतील जोखीम अतिशय कार्यक्षमतेने हाताळली जाते. सफायर इक्विटी लाँग-शॉर्ट एसआयएफचे पोर्टफोलिओ मॅनेजर अरिहंत जैन म्हणाले की, या फंडासाठी वापरले जाणारे 'क्वांटिटेटिव्ह मॉडेल' हे समभागांचे मूल्यमापन करण्यासाठी अनेक आगाऊ माहिती देणारे ('लीडिंग') आणि नंतर माहिती देणाऱ्या ('लॅगिंग') विविध संकेतांचा वापर करते. बाजाराच्या बदलत्या परिस्थितीत वेगवेगळे घटक वेगवेगळ्या प्रकारे कामगिरी करत असते आणि हे ओळखून हे प्रारुप तयार केलेले आहे. हे प्रारुप दीर्घकालीन गुंतवणूक आणि निवडक शॉर्ट पोझिशनिंग या दोन्हींसाठी समभागांना गुण आणि क्रमवारी प्रदान करते आणि त्यामुळे बाजारातील बदलांना अधिक संतुलित प्रतिसाद देणे शक्य होते. जोखीम व्यवस्थापनावर मजबूत भर कायम ठेवत बाजारातील परिस्थितीनुसार जुळवून घेण्यासाठी हे प्रारुप तयार करण्यात आलेले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### रहाटणी, तापकीरनगर परिसरात अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची कारवाई

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २७ मधील वृंदावन कॉलनी, रहाटणी तसेच तापकीर मळा चौक, तापकीर नगर, रहाटणी या परिसरांमध्ये अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान एकूण अंदाजे ८८.८७ चौरस मीटर क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली. महापालिका प्रशासनाने शहरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी कठोर भूमिका घेतली असून, त्या अनुषंगाने ही कारवाई राबविण्यात आली. सदर कारवाई आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तर 'ग' क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात आली. कारवाई दरम्यान उप अभियंता जयवंत रोकडे यांच्या समन्वयातून महापालिका धडक कारवाई पथकाने सक्रिय सहभाग नोंदविला. यामध्ये बीट निरीक्षक किरण पवार, विनोद बजबळकर, दिग्विजय घोटकुले व ज्ञानराज खंडाळे यांचा समावेश होता. या मोहिमेसाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामग्रीची योग्य ती उपलब्धता करण्यात आली होती. कारवाई दरम्यान एम.एस.एफ.चे १२ जवान, १ पोलिस कर्मचारी, महापालिकेचे ५ मजूर तसेच ठेकेदारामार्फत ४ मजूर उपस्थित होते. याशिवाय जेसीबी ब्रेकर १, ट्रॅक्टर ब्रेकर १ तसेच ४ हातोड्यांच्या सहाय्याने अनधिकृत बांधकामांचे निष्कासन करण्यात आले. महापालिका प्रशासनाकडून शहरातील अनधिकृत बांधकामांविरुद्ध अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून, नागरिकांनी बांधकाम करताना नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



### चिंचवड स्टेशन येथे रस्त्यालगत ट्रक उलटला; सुदैवाने जीवितहानी टळली

पिंपरी (दैनिक संध्या) : चिंचवड स्टेशन परिसरात आज रस्त्यालगत सुरू असलेल्या खोदकामादरम्यान एक ट्रक उलटल्याची घटना घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेमुळे शहरातील सुरू असलेल्या रस्ते कामांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठिकाणी रस्त्याच्या कडेला खड्डा खोदण्याचे काम सुरू होते. याच दरम्यान तोल जाऊन ट्रक उलटला. अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. शहरात सध्या विविध ठिकाणी रस्ते कामे सुरू असून, अनेक ठिकाणी योग्य सुरक्षा उपाययोजना न करता काम सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. कामाच्या ठिकाणी बॅरिकेट्स, सूचना फलक किंवा इशारे नसल्यामुळे वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत आहे. यापूर्वीही अशाच प्रकारच्या निष्काळजीपणामुळे अनेक छोटे-मोठे अपघात घडले आहेत. ठेकेदारांच्या बेफिकीर कारभारामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. दरम्यान, वारंवार घडणाऱ्या अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करणार का, असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### भरधाव टेम्पोची दुचाकीला जोरदार धडक; एकाचा जागीच मृत्यू

पिंपरी (दैनिक संध्या) : भरधाव वेगात जाणाऱ्या आयशर टेम्पोने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामुळे झालेल्या अपघातात दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाला. हा अपघात मंगळवारी (दि. ३१ मार्च) रोजी दुपारी दीडच्या सुमारास तळेगाव-चाकण रोडवर घडला. विजय तुळशीराम कापडे (रा. चाकण) असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी राहुल मनोहर पाटील (वय ३३, रा. चाकण, ता. खेड, जि. पुणे) यांनी मंगळवारी (दि. ३१ मार्च) रोजी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी टेम्पो चालक अरविंदकुमार विजय बहादूर यादव (वय ५०, रा. वसई, पालघर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी चालक हा आपला आयशर टेम्पो (MH 48 DC 1211) घेऊन तळेगावकडून चाकणच्या दिशेने जात होता. त्याने रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून वेगाने गाडी चालवत समोरून येणाऱ्या होंडा शाइन दुचाकीला धडक दिली. या भीषण धडकेत विजय कापडे यांच्या डोक्याला आणि हाता-पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक रेळेकर या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

### पर्यटनाला विमान दराचा शॉक; पिंपरी-चिंचवडकरांचे फॉरेन ट्रिपचे स्वप्न भंगलं?

पिंपरी (दैनिक संध्या) : उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी देश-विदेशात सहलींचे नियोजन करणाऱ्या पिंपरी-चिंचवडकरांचा उत्साह यंदा लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे दिसून येत आहे. विमान तिकिटांच्या प्रचंड दरवाढीमुळे आणि जागतिक परिस्थितीतील अनिश्चिततेमुळे पर्यटनाचे बजेट ३० ते ४० टक्क्यांनी वाढले असून, याचा थेट परिणाम पर्यटकांच्या संख्येवर झाला आहे. गेल्या काही आठवड्यांपासून पश्चिम आशियात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय विमान सेवांवर दबाव वाढला आहे. विमानाच्या इंधन दरात मोठी वाढ झाल्याने तसेच पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे विमान कंपन्यांनी तिकीट दर मोठ्या प्रमाणात वाढवले आहेत. याशिवाय, डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण होत असल्याने परदेश प्रवासाचा खर्च आणखी वाढला आहे. परिणामी, मध्यमवर्गीय आणि उच्चमध्यमवर्गीय कुटुंबांनी यंदा पर्यटनाच्या योजना पुढे ढकलण्याचा किंवा रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचे चित्र आहे. ट्रॅव्हल एजन्सींना चौकशी येत असली तरी प्रत्यक्ष बुकिंगमध्ये मात्र मोठी घट झाली आहे. "स्थिती स्थिर होईपर्यंत थांबूया," अशी भूमिका अनेकांनी घेतल्याने 'वेट अँड वॉच'चा ट्रेंड वाढला आहे. विशेष म्हणजे, दुबई, ओमानसारख्या मार्गांवरून होणाऱ्या प्रवासाबाबतही पर्यटकांमध्ये साशंकता निर्माण झाली आहे. युद्धजन्य परिस्थिती आणि सुरक्षिततेच्या मुद्द्यांमुळे अनेकांनी या मार्गांना टाळण्याचा पर्याय स्वीकारला आहे. दरम्यान, परदेश प्रवास महागल्याने काही पर्यटकांनी देशांतर्गत पर्यटनाला प्राधान्य दिले आहे.

# झोपडपट्टी सेवाकर वसुलीत ऐतिहासिक कामगिरी!

## आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तब्बल १ कोटी १० लाखांचा विक्रमी सेवाकर वसूल



**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये म्हणजेच १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत तब्बल १ कोटी १० लाख ६० हजार ४२१ रुपयांचा झोपडपट्टी सेवाकर वसूल करीत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. गेल्या पाच वर्षांत एका आर्थिक वर्षात वसूल केलेला हा सर्वात जास्त सेवाकर आहे. महापालिकेच्या नियोजनबद्ध वसुली मोहिमेमुळे ही कामगिरी शक्य झाली असून सेवाकर भरणाऱ्या नागरिकांचे महापौर रवि लांडगे तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

> झोपडपट्टी सेवाकर वसुलीत झालेली विक्रमी वसुली ही महापालिकेच्या नियोजनबद्ध धोरणांची आणि नागरिकांच्या सकारात्मक प्रतिसादाची फलश्रुती आहे. नागरिकांनी वेळेत सेवाकर भरून शहराच्या विकासात दिलेला हातभार अत्यंत महत्त्वाचा आहे.
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सुलभ सुविधा आणि विशेष वसुली मोहिमा यामुळे यंदा विक्रमी सेवाकर वसुली शक्य झाली. झोपडपट्टीवासीयांनी आपला सेवाकर वेळेत भरून शहराच्या विकासात सहकार्य केले आहे. पुढील काळातही नागरिकांना अधिक सोयीस्कर सेवा देत महसूल वाढविण्यावर महापालिका भर देणार आहे.
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने यावर्षी सेवाकर वसुलीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. ऑनलाईन पेमेंट प्रणाली तसेच ऑफलाईन पद्धतीने सेवाकर भरण्यासाठी सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

नागरिकांच्या सोयीसाठी झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे कार्यालय मार्च २०२६ मध्ये साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात आले होते. सेवाकर भरणा सुलभ व्हावा आणि नागरिकांची गैरसोय टळावी यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने सेवाकर भरण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या या सर्व सुविधांमुळे यंदा पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सेवाकरामध्ये विक्रमी वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये १ कोटी १० लाख ६० हजार ४२१ रुपयांचा सेवाकर वसूल झाला आहे.

झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये २७ लाख ८१ हजार ९०१ रुपयांचा सेवाकर वसूल केला होता. त्यानंतर आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये ४५ लाख २४ हजार ४८४ रुपये, आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ४० लाख ९ हजार ७०५ रुपये व आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४५ लाख ३३ हजार ६९७ रुपयांचा सेवाकर वसूल झाला होता. तर, यंदा म्हणजेच आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सेवाकराच्या माध्यमातून १ कोटी १० लाख ६० हजार ४२१ रुपयांची वसुली झाली आहे. गेल्या पाच वर्षांतील सेवाकराच्या माध्यमातून झालेली ही सर्वात जास्त वसुली आहे, अशी माहिती उपायुक्त अण्णा बोदडे यांनी दिली.

## गोसेवक रामकृष्ण लांडगे यांची मानद पशुकल्याण अधिकारीपदी निवड

**पिंपरी (दै. संध्या)**

गोसेवा आणि पशुकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे गोसेवक रामकृष्ण महादेव लांडगे यांची महाराष्ट्र शासनाच्या मानद पशुकल्याण अधिकारीपदी निवड झाल्याने सर्व स्तरांतून आनंद आणि अभिमान व्यक्त केला जात आहे. त्यांच्या या निवडीमुळे पशुकल्याण क्षेत्रात कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळाली असून समाजात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. रामकृष्ण लांडगे हे गेल्या अनेक वर्षांपासून गोसेवा, पशुसंवर्धन आणि पशुकल्याण या क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. निराधार, जखमी व आजारी जनावरांना आश्रय देणे, त्यांच्यावर उपचार करणे तसेच



त्यांच्या संरक्षणासाठी विविध उपक्रम राबविणे अशा माध्यमातून त्यांनी मोलाची सेवा बजावली आहे. विशेषतः रस्त्यावर अपघातग्रस्त झालेल्या जनावरांना तातडीने मदत करून त्यांना उपचारासाठी दाखल करणे आणि त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी स्वीकारणे, या त्यांच्या कार्यामुळे समाजात त्यांची संवेदनशील व कर्तव्यदक्ष कार्यकर्ता अशी ओळख निर्माण झाली आहे. याशिवाय, पशुकल्याणाबाबत जनजागृती करण्यासाठी त्यांनी विविध मोहिमा राबवून गावोगावी जाऊन नागरिकांना पशुप्रेम, पशुसंवर्धनाचे महत्त्व आणि प्राण्यांप्रती दया व जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक नागरिक पशुकल्याणाच्या कार्यात सहभागी होत आहेत. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या निस्वार्थ, सातत्यपूर्ण आणि प्रभावी कार्याची दखल घेत ही मानाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. या निवडीमुळे रामकृष्ण लांडगे यांना आता अधिकृत पातळीवर पशुकल्याणासाठी कार्य करण्याची संधी मिळणार असून शासन आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून ते अधिक प्रभावीपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या अभिमानास्पद निवडीबद्दल विविध सामाजिक संस्था, गोसेवक, स्थानिक नागरिक तसेच मान्यवरांनी रामकृष्ण लांडगे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांनी भविष्यातही याच निष्ठेने पशुकल्याणासाठी कार्य करत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. लांडगे यांची ही निवड केवळ वैयक्तिक यश नसून संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब ठरत असून त्यांच्या कार्यातून समाजात पशुप्रेम आणि सेवाभाव अधिक दृढ होईल, असा आशावाद व्यक्त केला जात आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत ६२५७ कोटींचा आक्षेप

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी - चिंचवड महा पालिकेच्या विविध विभागांच्या लेखापरीक्षणातील (ऑडिट) आक्षेपांची संख्या आणि रक्कम वसुलीबाबत वेळोवेळी आयुक्त, महापौर, स्थायी समिती अध्यक्ष तसेच, मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करण्यात आली आहे. मात्र, कोणतीही ठोस कारवाई आजपर्यंत न झाल्याने आत्तापर्यंत तब्बल 6 हजार 257 कोटी 1 लाख 58 हजार 85 रुपयांपर्यंत आक्षेपाधीन रक्कम पोहचली आहे. त्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट होत आहे. त्याबाबत तातडीने कारवाई करण्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केली आहे. त्यांनी या प्रकरणी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी व महापौर रवी लांडगे यांच्याकडे तक्रार केली आहे. भापकर यांनी सांगितले की, महापालिकेत सन 1982-83 ते मार्च 2026 कालावधीत प्रलंबित आक्षेपाधीन रक्कम 1 हजार 726 कोटी 8 लाख 60 हजार 554 इतकी आहे. प्रलंबित वसूलपात्र रक्कम 139 कोटी 4 लाख 30 हजार 170 रुपये आहे. प्रलंबित रेकॉर्ड तपासणीसाठी उपलब्ध न झालेने आक्षेपाधित रक्कम 4 हजार 369 कोटी 79 लाख 88 हजार 161 इतकी आहे.

## आरटीओमध्ये मनुष्यबळाचा तुटवडा

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा दर्जा वाढवून त्याचे प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) करण्यात आले; मात्र अपुऱ्या मनुष्यबळामुळे या निर्णयाचा अपेक्षित फायदा नागरिकांना अद्याप मिळत नाही. नागरिकांना विविध कामांसाठी दोन ते तीन दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे दर्जा वाढवला, मात्र कामाचे काय, असा प्रश्न येथे कामानिमित्त येणारे नागरिक उपस्थित करत आहेत. शासनाने जुलै 2023 मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाला प्रादेशिक दर्जा देण्यात आला. या निर्णयामुळे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मोठी वाढ झाली. जुन्नर, आंबेगाव, मावळ आणि पिंपरी-चिंचवड या विस्तृत भागाचा समावेश या कार्यालयाच्या अखत्यारित करण्यात आला. दर्जा वाढल्यानंतर कार्यालयासाठी एकूण 118 पदांना मंजुरी देण्यात आली. मात्र प्रत्यक्षात केवळ 95 पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे सुमारे 23 पदे अद्याप रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. आरटीओ कार्यालयात दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक विविध कामांसाठी येत असतात. यामध्ये वाहन परवाना काढणे, वाहन नोंदणी प्रमाणपत्र, वाहन मालकी हस्तांतरण, वाहन कर भरणा, वाहन फिटनेस प्रमाणपत्र, दंड (चालान) भरणा अशी विविध कामे असतात; मात्र कर्मचारी संख्या अपुरी असल्याने या कामांसाठी नागरिकांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात.

## बायोमायनिंग साईटची आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केली पाहणी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी मोशी येथील विविध प्रकल्पांना भेट देत कामकाजाचा सखोल आढावा घेतला. यावेळी आयुक्त यांनी वेस्ट टू एनर्जी प्रकल्पासोबतच प्लास्टिक टू फ्युएल प्रकल्प, हॉटेलमधील सेंद्रिय कचऱ्यावर आधारित बायोगॅस प्रकल्प, बांधकाम व पाडकाम (C&D) कचरा प्रक्रिया प्रकल्प तसेच बायोमायनिंग साईटचीही पाहणी केली. या भेटीदरम्यान मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी आयुक्तांना प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सर्व प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. तसेच, प्रत्यक्ष पाहणीदरम्यान कचऱ्याचे वर्गीकरण, प्रक्रिया आणि त्यापासून ऊर्जा निर्मिती या विविध टप्प्यांबाबत तांत्रिक माहिती



समजावून सांगत प्रकल्पाची कार्यपद्धती, कार्यक्षमता, सुरक्षितता आणि पर्यावरणीय परिणाम यांची सविस्तर माहिती दिली. या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट, उप अभियंता पंकज धेंडे, कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले, कनिष्ठ अभियंता स्वालिहा मुल्ला, आरोग्य निरीक्षक सुशील मलैये तसेच प्लांट हेड अशोक गुप्ता आणि सल्लागार स्वरूप लगारे उपस्थित होते. प्रकल्प अधिक सक्षम, पारदर्शक आणि शाश्वत पद्धतीने कार्यान्वित राहण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, तसेच नागरिकांमध्ये कचरा वर्गीकरणाबाबत जागरूकता वाढविण्याची गरज असल्याचेही आयुक्तांनी यावेळी अधोरेखित केले.

शहरातील कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प उभारला गेला असून, महाराष्ट्रातील अशा प्रकारचा हा पहिलाच मोठा प्रकल्प आहे. शहरातील वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर उपाय शोधत त्यातून वीज निर्मिती करण्याचा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

दररोज सुमारे ७०० ते १,००० मेट्रिक टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्याची त्याची क्षमता आहे व या प्रकल्पातून सुमारे १४ मेगावॅट प्रतितास वीज निर्मिती केली जाते.

# दापोडी व गवळी माथा शून्य कचरा प्रकल्पाची यशस्वी वाटचाल

**आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पाहणी करून घेतला आढावा । इतर झोपडपट्ट्यांमध्येही शाश्वत कचरा व्यवस्थापनासाठी हा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे दिले निर्देश**

**पिंपरी (दै. संध्या)**

दापोडी व गवळी माथा परिसरात राबविण्यात येत असलेल्या 'शून्य कचरा' प्रकल्पाचा आढावा घेताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विविध उपक्रमांची सखोल पाहणी केली. घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती त्यांनी यावेळी जाणून घेतली.

प्रकल्पस्थळी कार्यरत बचतगटातील महिलांशी संवाद साधत त्यांच्या कार्याचे कौतुकही त्यांनी केले. यावेळी आयुक्त म्हणाले की, दापोडी व गवळी माथा येथील शून्य कचरा प्रकल्प हा पर्यावरणपूरक आणि शाश्वत नागरी स्वच्छतेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

घरगुती कचऱ्याचे संकलन करून त्याचे ओला व सुका असे वर्गीकरण, तसेच त्यापासून खतनिर्मिती करण्याची प्रक्रिया प्रभावीपणे राबवली जात आहे. या प्रक्रियेत काम करणाऱ्या महिलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली




जात असून, आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याचेही डॉ. सूर्यवंशी यांनी नमूद केले.

स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच, दापोडी व गवळी माथा येथील शून्य कचरा प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीचा आदर्श घेऊन, शहरातील इतर झोपडपट्टी भागांमध्येही अशाच प्रकारचे प्रकल्प राबविण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यामुळे संपूर्ण शहरात शाश्वत कचरा व्यवस्थापनाचा विस्तार होण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. या पाहणीदरम्यान उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती सादर केली.

दापोडी व गवळी माथा परिसरातील 'शून्य कचरा' प्रकल्प शहरासाठी एक आदर्श मॉडेल ठरत असून, पर्यावरण संवर्धनासह स्वच्छतेच्या दृष्टीने मोठे योगदान देत आहे. भविष्यात अशा प्रकल्पांची संख्या वाढवून पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ व सुंदर करण्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याबाबत यावेळी आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली.

यावेळी आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त अण्णा बोदडे, सहा. आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, पूजा दुधनाळे, सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, योगेश फल्ले, मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी, वैभव घोळवे, सतीश इंगेडवाड, दीपक कोटियाना, आरोग्य निरीक्षक सचिन जाधव तसेच, सीवायडीए संस्थेचे कार्यकारी संचालक प्रविण जाधव, प्रकल्प व्यवस्थापक आशिष इंगोले, प्रकल्प अधिकार किशोर काळे तसेच, सुमित चंदनशिवे,नवनाथ ढेंबरे, ऋषिकेश चौधरी यांच्याबरोबर अन्य महापालिका अधिकारी व कर्मचारी देखील उपस्थित होते.

### असा आहे शून्य कचरा प्रकल्प

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सीवायडीए संस्था आणि अकर सोल्युशन यांच्या सहकार्याने दापोडीतील आनंदवन व काटेवस्ती येथे 'शून्य कचरा' प्रकल्प सुरू केला आहे. वैष्णवी महिला बचत गटामार्फत हा प्रकल्प यशस्वीपणे चालवला जात असून, गवळी माथा येथे श्रीकृष्ण महिला बचत गटाकडून प्रकल्प चालविण्यात येत आहे. दापोडीतील दररोज ४२८ घरांमधील कचऱ्याचे संकलन करून त्याचे ओला व सुका असे वर्गीकरण केले जाते. त्यानंतर धूळ झटकण्याची मशीन, ॲग्लोमीटर, हायड्रॉलिक प्रेस तसेच सेमी-ऑटोमॅटिक खतनिर्मिती यंत्रांच्या सहाय्याने कचऱ्यावर प्रक्रिया करून सेंद्रिय खत तयार केले जाते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### इनर व्हील क्लब ऑफ पुणे प्लॅटिनम संस्थेकडून हरणी विद्यालयास शैक्षणिक मदत

जेजुरी (दैनिक संध्या) : श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड, संचलित हरणी माध्यमिक विद्यालय हे पुरंदर तालुक्यातील नामांकित विद्यालय समजले जाते,या विद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून विद्यालचा गौरव वाढवण्यासाठी प्रयत्न केला आहे. शैक्षणिक, सामाजिक, नैसर्गिक, अध्यात्मिक, वैज्ञानिक, कला, क्रीडा क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारी शाळा म्हणून या शाळेची ओळख आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर त्यांच्या शारीरिक- मानसिक स्वास्थ्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. अशा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत अनेकांनी योगदान दिले आहे. इनरव्हील क्लब ऑफ पुणे, प्लॅटिनम या संस्थेच्या प्रेसिडेंट कल्पना बोरा, स्वाती हिरवे (माजी प्रेसिडेंट,) माधुरी बोरा (खजिनदार) यांनी हरणी विद्यालयस भेट दिली. विद्यालयाच्या एकंदरीत शैक्षणिक कार्याचा आढावा घेऊन समाधान व्यक्त केले. विद्यालयाच्या अडीअडचणी समजून घेतल्यानंतर विद्यालयाच्या स्वच्छतागृहच्या दुरुस्तीसाठी एक लाख रुपये मदत देऊ केली. तसेच भविष्यातील शैक्षणिक अडचणी दूर करण्यासाठी मदतीचा व सहकार्याचा हात देऊ असे आश्वासन दिले. इनर व्हील क्लब ऑफ पुणे प्लॅटिनम या संस्थेने आजपर्यंत अनेक ग्रामीण व दुर्गम डोंगरी भागातील विद्यालयांना मोठ्या प्रमाणामध्ये शैक्षणिक मदत देऊन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याचे स्तुत्य कार्य केले आहे.त्याबद्दल विद्यालयाच्या वतीने संस्थेचे आभार मानण्यात आले.

### आळंदीत 'भक्ती सोपान' पूल जमीनदोस्त; पर्यायी पुलामुळे भाविकांची सोय कायम

आळंदी (दैनिक संध्या) : आषाढी व कार्तिकी वारीत मुख्य दर्शन बारीसाठी तसेच नागरिकांच्या दैनंदिन पायी वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरलेला इंद्रायणी नदीवरील 'भक्ती सोपान' पूल अखेर प्रशासनाने जमीनदोस्त केला. अनेक वर्षांपासून वापरात असलेला हा पूल कमकुवत झाल्याने तो धोकादायक ठरत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिराकडे जाण्यासाठी हा पूल भाविकांसाठी महत्त्वाचा दुवा होता. विशेषतः आषाढी आणि कार्तिकी वारीदरम्यान इंद्रायणी नदीच्या पलीकडील देहू फाटा परिसरात उभारण्यात येणाऱ्या दर्शन मंडपातून येणाऱ्या भाविकांना मंदिरात पोहोचण्यासाठी या पुलाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असे. मात्र, पुलाची रचना कालांतराने कमकुवत झाल्याने प्रशासनाने तो पाडण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जेसीबीच्या साह्याने संपूर्ण पूल जमीनदोस्त करण्यात आला असून, नदीपात्रात पडलेला अवशेष हटविण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, राज्य तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत पुंडलिक मंदिरालगत नव्याने पूल उभारण्यात आला असून, भाविकांच्या वाहतुकीची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे वारीदरम्यान होणाऱ्या गर्दीतही भाविकांची गैरसोय होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व नगरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले की, मागील आठ महिन्यांपासून 'भक्ती सोपान' पूल वापरासाठी बंद करण्यात आला होता. आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी धोकादायक पूल पाडण्याचे निर्देश दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

### आळंदीत दुहेरी हत्याकांड; चिमुरडीसह वृद्धेची निर्घृण हत्या, परिसरात खळबळ

आळंदी (दैनिक संध्या) : वारकरी संप्रदायाची पावन नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आळंदीत बुधवारी (दि. १) मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या दुहेरी हत्याकांडाने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. केळगाव-हनुमानवाडी येथील ठाकरवाडी परिसरात अज्ञात व्यक्तीने सहा वर्षांच्या चिमुरडीचा गळा आवळून, तर तिला सांभाळणाऱ्या ७९ वर्षीय वृद्ध महिलेच्या डोक्यात वार करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संगीता दत्तात्रय गवारी या इंद्रायणी कॅन्सर हॉस्पिटलमध्ये हाऊसकिपिंगच्या कामासाठी बुधवारी रात्री पाळीवर गेल्या होत्या. त्यांच्या गैरहजेरीत घरी नात धनश्री सोनू दत्तात्रय केदारी (वय ६) आणि शेजारी राहणाऱ्या मंगल शिंदे (वय ७९) या दोघीच होत्या. याच दरम्यान मध्यरात्री अज्ञाताने घरात प्रवेश करून गाढ झोपेत असलेल्या धनश्रीचा गळा आवळला, तर मंगल शिंदे यांच्या डोक्यावर जोरदार वार करून दोघांचीही हत्या केली. गुरुवारी (दि. २) सकाळी संगीता गवारी या कामावरून घरी परतल्यानंतर हा भीषण प्रकार उघडकीस आला. घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेले मृतदेह पाहताच त्यांनी आरडाओरडा केला. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ आळंदी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. या दुहेरी हत्येमागील नेमका हेतू अद्याप स्पष्ट झालेला नसून चोरीचा उद्देश की जुना वाद, याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे आळंदी व परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली असून, आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### तीर्थक्षेत्र श्री यमाईदेवी मंदिर येथे भव्य यात्रोत्सव व हनुमान जयंती उत्सव



कवठे येमाई (दैनिक संध्या) : महाराष्ट्रातील तमाम भाविक भक्तांचे श्रद्धास्थान व कुलदैवत असलेले शिरूर तालुक्यातील कवठे येमाई गावाचे ग्रामदैवत असलेल्या तीर्थक्षेत्र श्री येमाईदेवीची यात्रा व हनुमान जयंती उत्सव गुरुवार दिनांक २ व ३ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीने दिली आहे. हा यात्रोत्सव व वीर हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय यात्रोत्सव सोहळ्यानिमित्त गावात विविध धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. यात्रेच्या निमित्ताने पारंपरिक बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतींमध्ये प्रथम क्रमांकासाठी १ लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७१ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५१ हजार रुपये तर चतुर्थ क्रमांकासाठी २५ हजार रुपये अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. तसेच फायनल फेरीसाठी विशेष भव्य चषक देण्यात येणार असून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे १५ हजार, ११ हजार व ७५०० रुपयांची अतिरिक्त बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात येणार असून परिसरातील नामांकित मल्लांचा सहभाग अपेक्षित आहे. तसेच गुरुवारी रात्री ९ ते पहाटे ३ वाजेपर्यंत संगीतरत्न स्व. दत्ता महाडिक पुणेकर यांच्या तमाशा मंडळाच्या लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत आणखी वाढणार आहे. याशिवाय दि. २ गुरुवारी गावठाणात आयोजित पालखी सोहळा हे यात्रेचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. या वेळी ढोल ताशा मंडळ जुन्नर यांचे आकर्षक ढोल-ताशा वादन भाविकांचे लक्ष वेधून घेणार आहे.

# दशक्रिया विधीतून पर्यावरणाचा संदेश

## लक्ष्मीतरु वृक्ष वाटपाने वारघडे परिवाराचा आदर्श उपक्रम



**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या उक्तीला साजेसा आदर्श वारघडे परिवाराने समाजापुढे उभा केला आहे. मातोश्रींच्या दशक्रिया विधीप्रसंगी आलेल्या नागरिकांना लक्ष्मीतरु या बहुगुणी वृक्षाची रोपे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देण्यात आला. या उपक्रमाचे सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.

बकोरी देवराई वनराईचे निर्माते तसेच माहिती सेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांच्या मातोश्री व दत्तकृपा विविध कार्यकारी सोसायटीच्या संस्थापिका कै. कमल गोविंद वारघडे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या दशक्रिया विधीनिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंगचे कार्यकर्ते प्रभाकर जगताप यांच्या माध्यमातून लक्ष्मीतरु या वृक्षाच्या सुमारे १००० रोपट्यांचे वाटप करण्यात आले. या माध्यमातून दिवंगत मातोश्रींना अनोखी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

लक्ष्मीतरु हे झाड औषधी गुणधर्मांनी समृद्ध असून पर्यावरण संवर्धनासाठी अत्यंत उपयुक्त मानले जाते. या वृक्षांची लागवड वाढणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रभाकर जगताप यांनी यावेळी केले.

'झाडे लावा, झाडे जगवा' तसेच 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या तत्त्वांचा अवलंब करत चंद्रकांत वारघडे यांनी बकोरी परिसरात देवराई वनराई प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत दोन लाखांहून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली असून, एक कोटी वृक्ष लागवडीचा त्यांचा संकल्प आहे. या पार्श्वभूमीवर दशक्रिया विधीतून वृक्ष वाटपाचा उपक्रम राबवून त्यांनी सामाजिक बांधिलकीचे वेगळे उदाहरण निर्माण केले आहे.

कार्यक्रमात युवा प्रवचनकार प्राजक्ता झेंडे करंदी यांनी आपल्या प्रभावी प्रवचनातून आईच्या महत्त्वावर प्रकाश टाकत कै. कमल वारघडे यांच्या आयुष्यातील दानधर्म आणि सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले.

आमदार बापूसाहेब पठारे यांनी वारघडे यांच्या वृक्षप्रेमाचा उल्लेख करत, त्यांच्या कार्यामुळेच आजच्या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाल्याचे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) प्रवक्ते विकास लवांडे यांनी अंधश्रद्धेला बळी न पडता समाजहिताचे कार्य करण्याचे आवाहन केले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव भोंडवे यांनी वारघडे परिवाराने पारंपरिक रूढींना आधुनिकतेची जोड देत पर्यावरणपूरक उपक्रम राबवल्याबद्दल अभिनंदन केले.

या कार्यक्रमास राज्यभरातून शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, पर्यावरणप्रेमी तसेच माहिती सेवा समितीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे दशक्रिया विधीसारख्या पारंपरिक कार्यक्रमातूनही पर्यावरण संवर्धनाचा संदेश देता येतो, हे वारघडे परिवाराने दाखवून दिले असून समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

## वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

**ओतूर (दै. संध्या)**

श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा २०२५-२६ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध अभिनेते व वक्ते माननीय राहुल सोलापूरकर उपस्थित होते. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा निर्माण झाली. यश ही योगायोगाने मिळणारी गोष्ट नसून ती परिश्रम, शिस्त आणि जिद्दीची फलश्रुती आहे असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश दामा यांनी आपल्या प्रस्तावनेत वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या गौरव सोहळ्यामध्ये ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल तर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या ब्रोशर चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्याचबरोबर प्राचार्य डॉ.गणेश दामा व डॉ.किरण महाजन यांनी लिहिलेल्या इमर्जिंग रिसर्च ट्रेंड्स इन फार्मास्युटिकल सायन्स या पुस्तकाचे उद्घाटनही करण्यात आले. त्यावेळी प्रकाशित केलेले हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रवासाला नवी दिशा देणारे ठरेल आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला अधिक बळकटी देईल असे मत संस्थेचे अध्यक्ष श्री.विशाल तांबे यांनी व्यक्त केले. सोहळ्या दरम्यान स्टाफ अप्रिसिएशनच्या माध्यमातून व्यवस्थापन समितीच्या निकषांप्रमाणे उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला,यावेळी संस्थेचे मानद सचिव श्री. वैभव तांबे यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. त्यामध्ये डिप्लोमा फार्मसी मधून सानिका कोडलकर जी संपूर्ण महाराष्ट्रातून तब्बल ३०० महाविद्यालयांतून एम एस बी टी इ एक्झाम मध्ये प्रथम आली तिचा देखील सन्मान सोहळा पार पडला. संस्थेच्या संचालिका श्रीमती नीलम ताई तांबे व मान्यवरांच्या हस्ते मिळालेली कौतुकाची थाप विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली.



प्रमुख पाहुणे यांच्या समवेत डॉक्टर मनोहर डोळे हॉस्पिटल ट्रस्टी व केमिस्ट असोसिएशनचे माजी अध्यक्ष श्री.वीरेंद्र शहा, पंचायत समिती सदस्य श्री प्रशांत डुंबरे, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्रीहरी तांबे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर कार्यक्रमाचा शेवट माननीय राहुल सोलापूरकर यांच्या टकलू हैवान या गाजलेल्या भूमिकेतील सादरीकरणाने झाला त्यांच्या दमदार संवादांनी संपूर्ण सभागृह अक्षरशः दणाणून गेला.

मागील आठवडाभरामध्ये ऊर्जा या थीमच्या अंतर्गत रंगोली, ट्रॅडिशनल डे, सिंगिंग ,डान्स,फॅशन शो, क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ, अशा विविध स्पर्धांचे उत्साहात व जल्लोषात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून शिस्तबद्ध व उत्कृष्ट कामगिरीचे दर्शन घडविले या सर्व स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान करताना सभागृहात कौतुकाची दाद आणि टाळ्यांचा कडकडाट घुमला अशी माहिती महाविद्यालयाचे सांस्कृतिक अधिकारी डॉ.शितल बिडकर यांनी दिली.

## चाकणकर नागरिक घेणार आता मोकळा श्वास

### वाहतूक कोंडी सुटणार

**चाकण (दै. संध्या)**



विस्तारत्या उद्योग नगरीतील भीषण वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी शासनाने युद्धपतळीवर प्रयत्न सुरू केले आहेत. चाकण, तळेगाव व शिक्रापूर हा एलिव्हेटेड मार्ग व नाशिक फाटा ते खेड या तीस किलोमीटर लांबीच्या आठ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पाने महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. अल्पावधीतच या मार्गाची कामे सुरू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. चाकण, तळेगाव व शिक्रापूर हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक एनएच - ५४८ डी हा रस्ता विकसित करण्याच्या कामाचा अंतिम अध्यादेश सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केला आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळामार्फत " रचना करा, बांधा वापरा आणि हस्तांतरित करा (डीबीओटी) तत्वावर हे काम होणार आहे. शिक्रापूर, चाकण व तळेगाव हा ५३ किलोमीटरचा महामार्ग मुंबई, पुणे आणि पुणे छत्रपती संभाजीनगर या दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी सतत वाहतुकीची कोंडी होत आहे. हे सर्व टाळण्यासाठी तळेगाव ते चाकण मार्गावर चार पदरी उन्नत महामार्ग आणि जमिनीस समांतर चार पदरी रस्ता विकसित करणे, तसेच चाकण ते शिक्रापूर मार्गात जमिनीत समांतर चार पदरी रस्ता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळामार्फत विकसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## गणेश बोत्रे यांनी घेतला नाणेकरवाडी महाळुंगे गटाचा आढावा

**चाकण (दै. संध्या)**

खेड तालुक्यात सर्वात श्रीमंत समजला जात असलेल्या नाणेकरवाडी महाळुंगे जिल्हा परिषद गटाचा आढावा या गटाचे सदस्य गणेश बोत्रे यांनी घेतला. नाणेकरवाडी महाळुंगे या जिल्हा परिषद गटातील गावांना उन्हाळ्याच्या काळात झळा सोसायला लागू नयेत, यासाठी गणेश बोत्रे यांनी पुढाकार घेतला आहे. सांगुर्डी, येलवाडी, खालुंब्रे, खराबवाडी, वासुली व सावरदरी या गावांमधील भीषण पाणी टंचाई आणि कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी बोत्रे यांनी प्रत्यक्ष या गटातील ग्रामपंचायतींना भेट देऊन समस्यांचा आढावा घेतला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस विशालभाऊ तुळवे, अजित केसवड आदी उपस्थित होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पाणी काही ठराविक भागातच मिळत असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यावर बोत्रे यांनी सांगितले की, पाण्याचे सुयोग्य नियोजन केले पाहिजे. कोणीही हलगर्जीपणा न करता नागरीकांना वेठीस धरण्याचे टाळले पाहिजे. चाकण लगतच्या खराबवाडी येथे एमजेपी अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या टाकीच्या कामाची बोत्रे यांनी अधिकाऱ्यांसह पाहणी केली. हे काम तातडीने पूर्ण करावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच खराबवाडी येथील पाणी टंचाई बरोबरच कचऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनत चालला आहे. याकडे सर्वांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागू नये यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

## खराडी परिसरात गार्डन व व्यायामासाठी जागा मिळण्याची मागणी

### अमृतताई पठारे यांचे पुणे महानगरपालिकेकडे निवेदन

**कवठे येमाई (दै. संध्या)**



पुणे शहरातील झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे चित्र समोर येत आहे. याच पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे खराडी परिसरातील मोकळी जागा गार्डन व व्यायामासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या अमृतताई पठारे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

खराडी येथील नागरिक अमृत कैलास पठारे यांनी याबाबत मा. उपआयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका यांना लेखी अर्ज सादर केला आहे. या अर्जात मौजे खराडी येथील सर्वे नं. १३/१+१ अ/१६ या ठिकाणची महानगरपालिकेची मोकळी जागा नागरिकांच्या उपयोगासाठी राखीव ठेवण्याची विनंती करण्यात आली आहे.

सदर जागा लहान मुलांसाठी खेळण्यासाठी, ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी तसेच नागरिकांना योगा व व्यायामासाठी उपयोगी पडावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सध्या खराडी,थिटे वस्ती पुणे परिसरात अशा प्रकारच्या सार्वजनिक गार्डन किंवा व्यायामासाठी योग्य सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे.

विशेषतः वाढत्या शहरीकरणामुळे खुल्या जागांची कमतरता भासत असून मुलांच्या शारीरिक विकासासाठी तसेच नागरिकांच्या आरोग्यासाठी गार्डनची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित जागा कायमस्वरूपी गार्डन व व्यायामासाठी राखीव करून विकसित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच, हा उपक्रम सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा असून सर्व नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैली साठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास अमृतताई पठारे यांनी व्यक्त केला आहे.आता पुणे महानगरपालिका प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे खराडी परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## धामणीत चैत्र पौर्णिमेनिमित्त खंडोबाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

**मंचर (दै. संध्या)**

आंबेगाव तालुक्यातील धामणी येथे चैत्र पौर्णिमेच्या निमित्ताने कुलस्वामी श्री खंडोबा मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी (२ एप्रिल २०२६) 'सदानंदाचा येळकोट, जय मल्हार'च्या जयघोषात शेकडो भाविकांनी पुरातन श्री म्हाळसाकांत खंडोबाचे दर्शन घेतले.



चैत्र पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर खंडेरायाच्या स्वयंभू सप्तशिवलिंगावर वसंत ऋतूतील दुसरी वासंतिक चंदनउटी साकारण्यात आली. तसेच खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या मूर्तींवर चंदनउटीचा लेप देण्यात आला. या मनोहारी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

पहाटे चार वाजता मंदिरात घंटानादाने कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर विविध भाविकांच्या हस्ते वसंत पूजा, दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक विधी पार पडले. खंडोबा, म्हाळसाई, बाणाई व जोगेश्वरी यांच्या मूर्तींना आकर्षक वस्त्रालंकार व सुगंधी फुलांचे हार घालण्यात आले.

देवस्थानचे सेवेकरी प्रभाकर भगत, दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत आदींच्या हस्ते स्वयंभू सप्तशिवलिंग व पंचधातूच्या मुखवट्यांवर केशर व दवण्याच्या अत्तरमिश्रित चंदनाचा लेप करण्यात आला. त्यानंतर खंडेरायाला पुरणपोळी, भजी व कुरडईचा नैवेद्य दाखवण्यात आला व भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली.

मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. सभामंडपात अभंग गायन सुरू असताना बाहेर पारंपरिक वाद्यांच्या सनईच्या सुरांनी वातावरण भारावून गेले होते. उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी मंदिरात झेंडू, गुलाब व इतर फुलांची सजावट तसेच आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पहाटेपासूनच मंदिर परिसरात रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली होती.

चंदनउटी सोहळ्यानंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. चंदनउटीमुळे उष्णतेपासून दिलासा मिळतो तसेच हरिनामाच्या भजनातून मानसिक शांती लाभते, असे भाविकांनी सांगितले. या निमित्ताने पुणे, नगर, नाशिक, मुंबई, पिंपरी-चिंचवड आदी भागांतून भाविक मोठ्या संख्येने सहकुटुंब दाखल झाले होते. मंदिर परिसरात जागरण, वाघे-वीरांचे पारंपरिक कार्यक्रम तसेच विविध पूजाविधी पार पडले. बाहेरील परिसरात तळीभंडार, फुले व पेढ्यांच्या दुकानांनीही गर्दी केली होती.

धामणी ग्रामस्थांनी २०२४ पासून तब्बल ६६ वर्षांनंतर पुन्हा चंदनउटी लेपन सोहळ्याची परंपरा सुरू केली असून गुढीपाडवा, चैत्र पौर्णिमा व अक्षय तृतीया या तीन सणांवर हा सोहळा साजरा केला जातो, अशी माहिती देवस्थानचे सेवेकरी दादाभाऊ भगत यांनी दिली.

दरम्यान, धामणीतील पुरातन मारुती मंदिरातही पहाटे अभिषेक व भजन कार्यक्रम पार पडले. गुळाची शेरणी वाटप व मारुतीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये सर्व सामान्य जनतेला शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांद्वारे सोयी, सुविधा, लाभ आदी पोचविण्यासाठी शासन सक्षमपणे कार्य करते. आणि या व्यवस्थेची भिस्त असणारी प्रशासन व्यवस्था त्यामुळेच सक्षम असावी लागते. प्रशासनात कार्य करणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करता यावा यासाठी विविध प्रशिक्षणांद्वारे क्षमता विकास करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून केंद्र शासनाने क्षमता विकास आयोग (सीबीसी) आणि-कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत 'साधना सप्ताह' आयोजित केला आहे. महाराष्ट्रातही मंत्रालयीन व राज्यभरातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी 'साधना सप्ताह' अंतर्गत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.




# गतिमान प्रशासनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग

## राज्यात 'साधना सप्ताह'

रितेश मोतीरामजी भुयार, माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क, नागपूर

आधुनिक तंत्रज्ञानाचा सर्व क्षेत्रात होत असलेला वापर पाहता राज्य शासनाचाही तंत्रज्ञानाधारित कार्यक्रमात पुढाकार राहिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या गतिमान प्रशासनाची घोडदौड सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम आणि 150 दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या पाठोपाठ आता केंद्रशासनाचा 'साधना सप्ताह' राज्यात राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या मंत्रालयीन सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी तसेच विभागीय आयुक्त कार्यालये आणि विभागांतर्गत येणारे जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा परिषद आदींमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी या सप्ताह अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा यासह प्रशासनातील विविध विभागामध्ये सक्षमपणे कार्य करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या उपयोगाधारित प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या मोहिमेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभाग आणि कार्यालय प्रमुखांना मे 2026 मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या 'TECH-वारी 2.0' या कार्यक्रमावेळी प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. 'कर्मयोगी भारत' हा केंद्र शासनाचा एक डिजिटल प्लॅटफॉर्म व अभिनव राष्ट्रीय उपक्रम आहे. तंत्रज्ञान-आधारित शिक्षणाद्वारे शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, कौशल्य आणि शासनक्षमता वाढविण्यासाठी या प्लॅटफॉर्मवर विविध प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. केंद्र शासनाने 'साधना सप्ताह' अंतर्गत शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी कर्मयोगी प्लॅटफॉर्म वरील तंत्रज्ञानाधारित ५० प्रशिक्षण कार्यक्रमांची यादी तयार केली आहे. या सप्ताह अंतर्गत प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यादीतील एकूण प्रशिक्षण कार्यक्रमांपैकी किमान चार तासांचे प्रशिक्षण करणे अनिवार्य आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये 'लोकप्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता', 'आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मूळ बाबी : शिकणे, उपयोग आणि नैतिकता', 'प्रशासनासाठी जबाबदार एआयचा उपयोग', 'सर्वांसाठी युवा ए आय' असे एकूण 44 मिनिटे ते 46 तास काल मर्यादेचे एकूण 50 प्रशिक्षण कार्यक्रम कर्मयोगी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**महासंचालकांच्या पुढाकाराने माहिती व जनसंपर्क विभागातही 'साधना सप्ताह'**

केंद्र शासनाच्या सूचनानुसार प्रशासकीय क्षमता सुधारण्यासाठी राबविण्यात येत असलेला 'साधना सप्ताह' हा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात या विभागात राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा माहिती कार्यालये, मुंबई येथील या विभागाचे मुख्यालय तसेच महाराष्ट्र परिचय केंद्र नवी दिल्ली आणि पणजी येथील कार्यालयांमधील १००२ अधिकारी-कर्मचारी 'साधना सप्ताह' अंतर्गत विविध प्रशिक्षण पूर्ण करणार आहेत. महासंचालक ब्रिजेस सिंह यांनी या संदर्भात बैठक घेऊन विभागाला सूचना दिल्या आहेत.

**माहिती संचालनालयाच्या नागपूर- अमरावती विभागातही साधना सप्ताहाचा उत्साह**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर-अमरावती विभागातही 'साधना सप्ताह' अंतर्गत विभागातील एकूण 174 अधिकारी- कर्मचारी या प्रशिक्षणात सहभागी होणार आहेत. यापूर्वी विभागातील शिपाई, वाहन चालक या वर्ग 'ड' पासून वरिष्ठ वर्ग 'अ' पर्यंतच्या सर्वच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कर्मयोगी भारत पोर्टलवरील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहे. यामध्ये विशेषतः अमरावती विभागातील अकोला जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार यांनी 390 तास काल मर्यादेचे 294 प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहेत. तर नागपूर विभागातून गडचिरोली चे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव यांनी 60 तास काल मर्यादेचे एकूण 63 प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहे. साधना सप्ताहातही नागपूर अमरावती विभागातील माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सर्व अधिकारी कर्मचारी हिरीरीने भाग घेऊन विहित काल मर्यादेचे प्रशिक्षण पूर्ण करणार आहेत आणि या संदर्भातील नियोजन करण्यात आले असल्याचे विभागाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे यांनी सांगितले आहे.

बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून प्रशासनाला गतिमान करण्यासाठी शासन स्तरावर सतत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा या नव्या आव्हानात्मक विषयांचा परिचय होऊन प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना अधिक सक्षमपणे व गतिमानतेने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडता याव्या यासाठी केंद्र शासनाचा 'साधना सप्ताह' राज्यभर राबविण्यात येत आहे. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या सप्ताहात सक्रिय भाग घेऊन जनता व शासनाप्रती आपली प्रतिबद्धता दृढ करण्याचे आवाहनही शासनातर्फे करण्यात आले आहे.



# सावधान! उन्हाळ्यात नकळत केलेल्या या चुका सर्दी, ताप आणि खोकल्याला देतात आमंत्रण

आपण सहसा पावसाळ्यात किंवा हिवाळ्यात आरोग्याबद्दल अधिक खबरदारी घेतो. कारण या काळात ताप आणि सर्दी यांसारख्या आरोग्य समस्या अधिक सामान्य असतात. खरं तर, अशा आरोग्य समस्या उन्हाळ्याच्या महिन्यांत अधिक प्रमाणात उद्भवतात. हिवाळ्याच्या तुलनेत उन्हाळ्यात आरोग्य समस्या अधिक सामान्य असतात. दुपारच्या कडक उन्हात तहान भागवण्यासाठी कुठल्याही दुकानातून घेतलेला एक ग्लास ज्यूस किंवा शीतपेय काही तासांतच तुमच्या पोटाला हानी पोहोचवू शकतात. बाहेर प्रवास करण्याच्या काही प्रकरणांमध्ये, बहुतेक लोक या लक्षणांकडे किरकोळ शारीरिक आजार म्हणून दुर्लक्ष करतात. हे उन्हाच्या उष्णतेमुळे किंवा अति सूर्यप्रकाशाच्या संपर्कात आल्यामुळे होते असं अनेकांना वाटते. ज्यामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. आपल्या निष्काळजीपणामुळे, आपल्या शरीरात प्रवेश करणारे रोगजंतू आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकतात. मात्र, उन्हाळ्याच्या सुरुवातीला आपल्या आरोग्याची थोडी काळजी घेतल्यास विविध आजारांपासून आपले संरक्षण होऊ शकते. ते कसं ते पाहूया...



उन्हाळ्यात संसर्ग का होतात?: साधारणपणे जेव्हा तापमान वाढते, तेव्हा हवेतील आर्द्रतेची पातळी वाढते. यामुळे जीवाणूंसारख्या सूक्ष्मजंतूंच्या जलद वाढीसाठी अधिक अनुकूल वातावरण निर्माण होते. वर्षातील इतर काळाच्या तुलनेत उन्हाळ्याच्या महिन्यांत शिजवलेले अन्न अधिक लवकर खराब होण्याचे हेच मुख्य कारण आहे. उन्हाळ्यात जेव्हा पाण्याची टंचाई ही एक गंभीर समस्या बनते, तेव्हा उपलब्ध पाण्याच्या साठवणूक आणि वापराशी संबंधित मानके अनेकदा खालावतात. परिणामी, यामुळे पाण्याद्वारे पसरणाऱ्या आजारांचा प्रसार होतो.

हैदराबाद येथील यशोदा रुग्णालयातील वरिष्ठ फिजिशियन, डॉ. हरी किशन यांच्या मते, उलट्या, जुलाब, पोटदुखी आणि ताप यांसारख्या उन्हाळ्यातील सामान्य आजारांमागील मुख्य कारणे आपण खात असलेले अन्न आणि पीत असलेले पाणी हे आहे. या लक्षणांना केवळ किरकोळ पोटदुखी समजून सामान्य मानण्याऐवजी, शरीरात सूक्ष्मजंतूंचा संसर्ग होत आहे हे आपण ओळखले पाहिजे आणि योग्य ती काळजी घेतली पाहिजे.

सावधगिरीने सेवन करा: उन्हाळ्यात, बाहेर जाताना रस्त्याच्या कडेला असलेल्या स्टॉल्सवर उघडी ठेवलेली कापलेली फळे आणि खाद्यपदार्थ खाणे कटाक्षाने टाळावे. जास्त वेळ सूर्यप्रकाशात राहिलेल्या खाद्यपदार्थांमध्ये जिवाणूंचा संसर्ग वेगाने होण्याची शक्यता अधिक असते. घरी बनवलेले अन्न व्यवस्थित झाकलेले नसल्यास आणि ते बनवणाऱ्या व्यक्तीने आपले हात नीट धुतले नसल्यास ते दूषित होऊ शकते. खाल्ल्यानंतर काही तासांत तुम्हाला शारीरिक अस्वस्थता जाणवल्यास, ते अन्न विषबाधेचे लक्षण असू शकते.

टायफॉइड ताप: दूषित अन्न आणि पाण्यामुळे होणारी आणखी एक मोठी आरोग्य समस्या म्हणजे टायफॉइड ताप. या आजाराची लक्षणे लगेच दिसून येत नाहीत. उलट, त्याची तीव्रता हळूहळूच स्पष्ट होते. सतत ताप, तीव्र शारीरिक अशक्तपणा, भूक न लागणे आणि तीव्र पोटदुखी ही त्याची वैशिष्ट्यपूर्ण लक्षणे आहेत. बरेच लोक या लक्षणांकडे केवळ थकवा म्हणून दुर्लक्ष करतात. सुरुवातीच्या टप्प्यात उपचार न केल्यास, यामुळे गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. दरवर्षी उन्हाळ्यात या आजाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता जास्त असते. सार्वजनिक पाणीपुरवठ्यात रोगजंतू शिरण्याचा धोका वाढतो. जेव्हा आपल्याला तहान लागते, तेव्हा आपण अनेकदा सहज उपलब्ध असलेले कोणतेही पाणी पितो. अशा परिस्थितीत काळजी घेणे महत्त्वाचे आहे. स्वयंपाकासाठी दूषित पाण्यात भाज्या धुतल्याने किंवा न गाळलेले पाणी प्यायल्याने रोगजंतू थेट पचनसंस्थेत प्रवेश करतात. यामुळे कावीळसारखे गंभीर आजार होऊ शकतात.उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या सामान्य आजारांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबद्दल डॉ. हरी किशन यांनी आपला सल्ला दिला आहे. नेहमी उकळून थंड केलेले पाणीच पिणे श्रेयस्कर आहे. बाहेर जाताना घरून पाणी सोबत नेणे अधिक सुरक्षित असते.

प्रत्येक जेवणापूर्वी आणि अन्न तयार करण्यापूर्वी साबणाने हात स्वच्छ धुण्याची सवय लावा.

शक्य असेल तेव्हा, ताजे शिजवलेले जेवण गरम असतानाच खावे. शिळे अन्न जास्त वेळ बाहेर ठेवू नका. त्याऐवजी, ते व्यवस्थित झाकून रेफ्रिजरेटरमध्ये ठेवावे.

दुकानात विकली जाणारी कापलेली फळेच खाण्याचा आग्रह धरू नका. त्याऐवजी, स्वतः अख्खी फळे विकत घ्या, ती नीट धुवा आणि मगच खा.

तहान लागेपर्यंत पाणी पिण्याची वाट पाहू नका. हायड्रेटेड राहण्यासाठी दिवसभर वारंवार पाणी पिण्याची गरज असते. नारळाचे पाणी, ताक आणि फळांचे रस शरीरासाठी सर्वात फायदेशीर असतात.



# उन्हाळ्यात वीज बिलामुळे वैताग आलाय?

## फॉलो करा 'या' टिप्स, हमखास कमी होईल वीज बिल

**उन्हाळा सुरु होताच उष्णतेमुळे लोक हैराण झाले आहेत. कडक उन्हात अनेक जण घराबाहेर पडणं टाळतात. कडक उन्हाळ्यापासून आणि घामाघूम करणाऱ्या रात्रींपासून स्वतःच संरक्षण करण्यासाठी पंखे, कुलर आणि एसी सतत चालू ठेवावे लागतात. यामुळे वीज बिलही डबल स्पीडने पळू लागतं. यामुळे खिशावर अतिरिक्त भार वाढू लागतो. परिणामी बिलं बघून अनेकांना टेन्शन येतो. परंतु तुम्हाला आता टेन्शन घेण्याची गरज नाही. काही बेसिक गोष्टींची काळजी घेऊन तुम्ही चालू वीज बिल कमी करू शकता. तज्ञांच्या मते, या टिप्स वापरून तुम्ही पैसे वाचवू शकता. चला तर मग वेळ वाया न घालवता वीज बिल कमी करण्याच्या टिप्सबद्दल माहिती जाणून घेऊया..**

सेटिंग्जमध्ये चेंज करा: चार्जिंगनंतर प्लग काढणे, सेटिंग्जमध्ये पॉवर सेव्हिंग मोड चालू करणे आणि एलईडी दिवे वापरणे या सर्व गोष्टी आपण अगदी सहजपणे करू शकतो. परंतु याचे फायदे अगणित आहेत. तज्ञांच्या मते, अशा छोट्या खबरदारीने आपण विजेची बचत करू शकतो. तज्ञांच्या मते, मोबाईल फोन, टीव्ही, कॉम्प्युटर, एसी आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या पॉवर सेव्हिंग सेटिंग्जमध्ये जाऊन 'पॉवर सेव्हिंग' पर्याय चालू करणे अनिवार्य आहे. यामुळे या उपकरणांचा वीज वापर कमी होईल. एलईडी दिवे: बहुतेक घरांमध्ये पारंपरिक इनकॅन्डेसेंट किंवा सीएफएल बल्ब वापरले जातात. यामुळे वीज बिल जास्त येतो. म्हणून तज्ञांच्या मते, त्यांच्या जागी एलईडी दिवे लावल्यास विजेचा वापर 75 ते 80टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो.

तज्ञांच्या मते, सीलिंग फॅन आणि एसी वापरताना खबरदारी घेणे आवश्यक आहे. ब्युरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी (BEE) च्या शिफारशीनुसार, एसी 24 ते 26अंश तापमानावर ठेवले पाहिजेत. महिन्यातून एकदा फिल्टर काढून, पाण्याने धुऊन, वाळवून पुन्हा बसवावेत, असं ते सांगतात. सीलिंग फॅन फक्त आवश्यक असलेल्या वेगानेच वापरावेत.

प्लग काढणे आवश्यक आहे: मोबाईल चार्जर, टीव्ही, मायक्रोवेव्ह ओव्हन आणि गिझर यांसारखी उपकरणे प्लगला लावलेली असताना फँटम करंट वापरतात. म्हणूनच तज्ञांच्या मते, काम संपल्यानंतर ती उपकरणे प्लगमधून काढणे आवश्यक आहे.

तपासा आणि खरेदी करा: रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन आणि एसी यांसारखी घरगुती उपकरणे खरेदी करताना, तज्ञांच्या मते, 5-स्टार किंवा उच्च-स्टार रेटिंग असलेल्या नामांकित कंपन्यांची आणि BEE-शिफारस केलेली उपकरणे खरेदी करणे आवश्यक आहे. जरी त्यांच्या किमती सामान्य, बनावट आणि लहान कंपन्यांपेक्षा थोड्या जास्त असल्या तरी, त्यांची निवड केल्यास दीर्घकाळात विजेचा वापर आणि मासिक बिलांमध्ये मोठी बचत होईल. 5-स्टार किंवा उच्च-स्टार रेटिंग असलेली उपकरणे कमी वीज वापरतात.

नैसर्गिक प्रकाशाचा वापर करा: तज्ञांच्या मते, सकाळी खिडक्या उघडून आणि पडदे बाजूला करून घरात सूर्यप्रकाश येऊ दिल्यास विजेचे दिवे आणि पंख्यांचा वापर कमी होऊ शकतो.

### आपण वीज का वाचवावी?

तज्ञांच्या मते, काही घरांमध्ये जनजागृतीच्या अभावामुळे दिवे, पंखे, टीव्ही, मोबाईल चार्जर, गिझर आणि एसी बराच वेळ चालू ठेवले जातात. ज्यामुळे विजेची नासाडी होते. असं म्हटलं जातं की, त्यांच्या वापरात किमान खबरदारी घेतल्यास विजेचे बिल किमान 20-30 टक्क्यांनी कमी करता येते. औष्णिक वीज प्रकल्पात एक युनिट वीज निर्माण करण्यासाठी ६००-७०० ग्रॅम कोळसा जाळावा लागतो. त्यांच्या मते, यामुळे हवेत मोठ्या प्रमाणात सल्फर डायऑक्साइड वायू सोडला जातो. ज्यामुळे सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होतो. त्यांच्या मते, वीज वाचवल्यास देश आणि तेथील लोकांचे या प्रदूषणापासून संरक्षण होऊ शकते.

# अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी २ ते ८ एप्रिलदरम्यान 'महा-साधना सप्ताह'!

भारत सरकार, क्षमता विकास आयोग (CBC) आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

वर्षा फडके – आंधळे, उपसंचालक (वृत्त) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

केंद्र शासनाने साधना सप्ताह उपक्रम राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्यानंतर आता राज्यातही महा-साधना सप्ताह 2 ते 8 एप्रिल या काळात आयोजित करण्यात आला आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत 8 लाख 80 हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी 7 दिवसांत किमान 4 तासांचे अभ्यासक्रम iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत. यामुळे जवळपास 35 लाखांहून अधिक वेळ अधिकारी आणि कर्मचारी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये राज्यातील 36 जिल्हे, 32 विभाग, आणि 6 विभागीय कार्यालये यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे असेल.

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम करण्यासाठी साधना सप्ताह हा iGOT कर्मयोगी भारत अंतर्गत राबविला जाणारा एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आहे. हा उपक्रम मिशन कर्मयोगी (Mission Karmayogi) चा एक भाग असून शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आयोजित केला जातो. एक आठवडाभर आयोजित केला जाणारा हा उपक्रम पूर्णपणे ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागांतील काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या स्वतःच्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुकर होण्याच्या पध्दती शिकतात. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे, डिजिटल गव्हर्नन्स आणि नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, सतत शिक्षण घेत राहणे,वेळ व्यवस्थापन ही सप्ताह आयोजित करण्यामागची मुख्य उद्दिष्टे असल्याने या सप्ताहात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केले आहे.

महा-साधना सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे iGOT Karmayogi App द्वारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या वेळेनुसार प्रशिक्षण घेता येईल. अधिकारी आणि कर्मचारी आपले काम सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करणार असल्याने कामकाजावर परिणाम न होता अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कौशल्यवृध्दी होण्यास मदत होईल. या अभ्यासक्रमांमुळे प्रत्येकाला स्वतःची क्षमता ओळखून त्यानुसार कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते. बदलत्या काळाशी सुसंगत राहण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नवीन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. आजच्या शासकीय कामकाजात सुद्धा विविध डिजिटल प्रणाली, ॲप्सचा वापर होत आहे. महा-साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात वापर, नागरिक केंद्रित सेवा आणि पारदर्शकता वाढविण्यास या सप्ताहाची मदत होणार आहे. या सप्ताहाच्या अनुषंगाने राज्यातील विविध शासकीय कार्यालये. जिल्हा कार्यालये यामध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन त्यांना नेमून दिलेले अभ्यासक्रम या काळात पूर्ण करणे गरजेचे राहील. पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी किमान 4 तास असणे अनिवार्य आहे. सर्व अभ्यासक्रम 2 ते 8 एप्रिल दरम्यान पूर्ण करणे गरजेचे असून कर्मयोगी भारत पोर्टलवर सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी नोंदणी आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे आहे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (या विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये) तसेच विभागीय आयुक्त (विभागीय आयुक्त कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हापरिषदा) या सर्वांनी साधना सप्ताहात एकूण 4 तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे राहील. विशेष म्हणजे साधना सप्ताह कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या (iGOT) पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे विभागांना महाराष्ट्रात मे महिन्यात होणाऱ्या 'TECH-वारी 2.0' मध्ये प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### डॉ. विशाल कडणे यांच्या प्रयत्नातून शैक्षणिक प्रश्नांवर महत्त्वपूर्ण बैठक

भिवंडी (दैनिक संध्या) : शिक्षक नेते डॉ.विशाल कडणे यांच्या पुढाकाराने मुंबईतील अंधेरी येथील चिल्ड्रन्स वेलफेअर सेंटर स्कूलमध्ये शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रलंबित व महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे ९ शैक्षणिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. भाजप मुंबई अध्यक्ष आ.अमित साटम यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक पार पडली.बैठकीदरम्यान शिक्षण क्षेत्रासमोरील विविध समस्या, अडचणी व सुधारणा यावर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण व वस्तुनिष्ठ मांडणी करत शिक्षण क्षेत्रातील प्रश्न अधोरेखित केले. यावेळी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी पावले उचलली जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सदर बैठकीस विभागीय अध्यक्ष (पश्चिम) अजय कोल,डॉ.विनय राऊत,सदानंद रावराणे,डॉ. कमलेश प्रधान,अशोक बेलसरे यांसह अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. या सकारात्मक चर्चेमुळे शिक्षण क्षेत्रातील एकीचे दर्शन घडले असून, ही एकजूट भविष्यातील प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असणारा आहे.

### पोटच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार; चाकण येथील प्रकार : बापास ठोकल्या बेड्या

चाकण (दैनिक संध्या) : बाप-लेकीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणारी एक अत्यंत घृणास्पद घटना चाकणमधील दावडमळा परिसरात उघडकीस आली आहे. पोटच्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापाला चाकण पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. राजेंद्र सुभाष राठोड (वय ३९ वर्षे) असे या नराधम बापाचे नाव आहे. अधिक माहिती अशी, ३० मार्च २०२६ रोजी सकाळी १०:३० ते दुपारी १२:३० च्या दरम्यान ही घटना घडली. आरोपी राजेंद्र राठोड हा व्यवसायाने ड्रायव्हर असून तो दावडमळा येथील कोहिनूर बिल्डिंगमध्ये कुटुंबासह राहतो. घटनेच्या वेळी पीडित मुलीची आई घरात नसल्याची संधी साधून, आरोपीने आपल्याच अल्पवयीन मुलीवर बळजबरीने अत्याचार केला. या धक्कादायक प्रसंगानंतर पीडित मुलीने घाबरून न जाता थेट पोलीस ठाणे गाठले आणि आपल्या नराधम बापाविरुद्ध तक्रार दिली. चाकण उत्तर पोलीस स्टेशन येथे याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ६५(१), ७४, ७५, ३५१(२) आणि पोक्सो (POCSO) कायद्याच्या कलम ४, ८, १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार प्रितम ढमढेरे, योगेश्वर कोळेकर, पोलीस शिपाई महेश कोळी यांनी आरोपीला नाशिक फाटा येथून ताब्यात घेतले. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार आणि महिला पोलीस उपनिरीक्षक संगीता कदम हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून, आरोपीला कठोर शिक्षा व्हावी याद्दष्टीने पुरावे गोळा केले जात आहेत. रक्षकच भक्षक बनल्याच्या या घटनेमुळे चाकण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

### IAS तुकाराम मुंढेंना मातृशोक, पुण्यात आईचं निधन; बीडमध्ये होणार अंत्यसंस्कार



पुणे (दैनिक संध्या) : आयएएस तुकाराम मुंढे यांच्या मातोश्री आसराबाई हरिभाऊ मुंढे यांचं पुण्यात निधन झालं. तुकारम मुंढे यांच्या आईचं वय ९० पेक्षा जास्त होतं. वार्धक्यानं त्यांचं निधन झालं असल्याची माहिती समोर येत आहे. आसराबाई यांनी पुण्यात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पार्थिवावर बीडमध्ये मूळगावी शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तुकाराम मुंढे हे कामानिमित्त पश्चिम बंगालमध्ये गेले होते. त्यावेळी त्यांना आईच्या निधनाची माहिती समजली. तुकाराम मुंढे पुण्याला यायला निघाले आहेत. तुकाराम मुंढे यांचे मूळगाव असलेल्या बीड जिल्ह्यातल्या ताडसोना इथं आसराबाई मुंढे यांच्यावर अंत्यसंस्कार होणार असल्याची माहिती मुंढे कुटुंबाने दिली आहे. नुकतीच तुकाराम मुंढे यांची दिव्यांग कल्याण मंत्रालयाच्या सचिव पदावरून बदली झालीय. आपल्या धडाकेबाज कामाच्या पद्धतीमुळे तुकाराम मुंढे हे ओळखले जातात. गेल्या २१ वर्षांच्या कार्यकाळात त्यांची २५ वेळा बदली झाली आहे.

# चैत्र पौर्णिमा यात्रेनिमित्त जेजुरी गडावर भाविकांची गर्दी

## खंडोबा देवाला दवण्याची पूजा

**जेजुरी (दै. संध्या)**

चैत्र पौर्णिमा यात्रेनिमित्त महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या दर्शनासाठी व कुलधर्म कुलाचार नुसार धार्मिक विधीसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. चैत्र पौर्णिमा हा खंडोबा देवाचा अवतार दीन असल्याने देवाला प्रिय असणाऱ्या सुगंधी दवण्याची पूजा करण्यात आली.


खंडोबा देवाच्या वर्षाकाठी 10 यात्रा भरतात. चैत्र शुद्ध पौर्णिमेला दुसऱ्या प्रहरी, चित्रा नक्षत्र, वसंत ऋतु या शुभदिवशी श्री शंकरांनी मार्तंड भैरवाचा म्हणजे खंडोबा देवाचा अवतार धारण केला.पौराणिक काळापासून दरवर्षी चैत्र शुद्ध पौर्णिमेला जेजुरी नगरीत देवाचा अवतार दिनानिम्मित मोठी यात्रा भरते.

विशेषतः या यात्रेस बहुजन बांधव व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने भाविक जेजुरी गडावर आले होते . आलेल्या भाविक-भक्तांकडून कुलधर्म कुलाचार केला जात होता.

तसेच गावोगावच्या शिखर काठ्या वाजत गाजत देव भेटीसाठी जेजुरी गडावर भाविकांनीआणल्या होत्या .शिखर काठ्यांची देव भेट होताच हजारो भाविकांनी देवाचे लेण असणारा भंडारा उधळून येळकोट येळकोट जयमल्हार, सदानंदाचा येळकोट असा खंडोबा देवाचां जयघोष केला.

दवणा सुगंधी वनस्पती. जेजुरीचा खंडोबा,कोल्हापूरचा ज्योतिबा,शिंगणापूरचा शंभू महादेव,कार्ला येथील एकवीरा व गावोगावच्या भैरवनाथाला दवणा प्रिय आहे. गुढी पाडवा ते चैत्र महिन्यात देवाला सुगंधी दवना अर्पण करण्याची पूर्वी पासून प्रथा आहे. जेजुरीच्या खंडोबा देवाला फळे,फुले, पाने,धान्य,भात, दवणा आदींच्या सप्त पूजा केली जाते.





चैत्र पौर्णिमा यात्रेनिमित्त श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने श्री खंडोबा मंदिर मुख्य गाभारा व गडकोटामध्ये फुलांची आकर्षक सजावट करून श्री खंडेरायास प्रिय असणारा दवणा अर्पण करून महापूजा करण्यात आली. देवाचे मानकरी सचिन झगडे यांनी देवाला हा दवणा अर्पण केला. चैत्र पौर्णिमा यात्रेस भाविकांची संख्या रोडावली.

जेजुरीच्या खंडोबा देवाच्या वर्षाकाठी दहा यात्रा भरतात. वर्षभरात सुमारे 50 लाखाहून अधिक भाविक येत असतात. विशेषतः चैत्र पौर्णिमा व खंडोबा देवाचा अवतारदीन असल्याने या यात्रेसाठी भाविकांची गर्दी होते. मात्र सध्या गावोगावच्या सुरू असलेल्या जत्रा, शालेय परीक्षा, कडक उन्हाळा, अचानक येणारा अवकाळी पाऊस यामुळे भाविकांची संख्या लक्षणीय घटली होती.

चैत्र पौर्णिमा यात्रेनिमित्त जेजुरी गडावर देवदर्शन, तळी भंडारा चां धार्मिक विधी, पुजारी वर्गाच्या निवासस्थानी व ऐतिहासिक चिंचेच्या बागेत जागरण गोंधळ आदी विधी भाविक करतानाचे चित्र पाहण्यास मिळाले. भाविकांच्या अनुषंगाने शहरातील बाजार पेठ भाविकांनी फुलून गेली होती. मात्र भाविकांची संख्या कमी असल्याने त्याचा परिणाम येथील बाजारपेठेत दिसून आला.

# गॅस टँकरमधून अवैधरित्या गॅस भरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; ४९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**चाकण (दै. संध्या)**

परिसरात घरगुती गॅसची टंचाई जाणवत असतानाच या परिस्थितीचा गैरफायदा घेत लोकांच्या जीविताशी खेळणाऱ्या टोळीचा चाकण उत्तर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. मंगळवारी पहाटेच्या सुमारास टाकलेल्या धाडीत अवैधरित्या गॅस रिफिलिंग करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून तब्बल ४९ लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चाकण उत्तर पोलिसांना गुप्त बातमीदारा मार्फत




भोसे (ता.खेड) गावच्या हद्दीत गॅस टँकरमधून अवैधपणे गॅस भरण्याचे काम सुरू असल्याची माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथक तयार करण्यात आले. मंगळवारी (दि.३१) पहाटे सुमारे ४:४० वाजता चाकण-शिक्रापूर रोडवरील इंडेन कंपनीच्या पार्किंगमध्ये पोलिसांनी छापा टाकला. यावेळी एम.एच.०४ एम.एच.७७८७ या गॅस टँकरचे आउटलेट सील तोडून कोणत्याही सुरक्षा उपाययोजनांशिवाय घरगुती गॅस सिलिंडरमध्ये गॅस भरला जात असल्याचे उघड झाले. अत्यंत धोकादायक पद्धतीने सुरू असलेल्या या प्रकारामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता होती.

या कारवाईत पोलिसांनी अंबादास रोहिदास गाडे (वय ४२, रा. चेंबूर, मुंबई), अक्षय रमेश मुंगसे (वय २५, रा. रासे, ता. खेड) आणि नवनाथ अंकुश होजगे (वय ३४, रा. भोसे, ता. खेड) यांना अटक केली. घटनास्थळावरून गॅस टँकर, रिफिलिंगसाठी वापरले जाणारे साहित्य आणि गॅस असा एकूण ४९,५७,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी चाकण उत्तर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि. नं. २८९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेल्या या धाडसी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत असून, अशा अवैध आणि जीवघेण्या व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## सय्यद यांच्या अप्रेंटिसशिप ॲक्ट १९६१ या तिसऱ्या पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

**चाकण (दै. संध्या)**

टॅलेंटकॉर्प सोल्यूशन्स या उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. महिबूब सय्यद यांच्या अप्रेंटिसशिप ॲक्ट १९६१ या विषयावरील तिसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन गोवा येथे शनिवारी (दि.४) होणार आहे. डॉ. सय्यद हे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकीतील पदवीधर असून, त्यांनी ट्रिपल एमबीए तसेच विविध परदेशी विद्यापीठांतून ट्रिपल पीएचडी प्राप्त केली आहे. यापूर्वी त्यांनी विविध प्रकारची पुस्तके लिहिली असून, त्यांच्या या पुस्तकांना वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. डॉ. सय्यद हे टीएसपीएल ग्रुपचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक असून, ते टॅलेंटकार्प एज्युकेशन अँड ट्रेनिंग फाउंडेशनचे अध्यक्ष आहेत. असोसिएशन ऑफ इंडियन



प्रायव्हेट युनिव्हर्सिटीचे कौन्सिल डायरेक्टर, तसेच ह्यूमन राईट प्रोटेक्शन फेडरेशनचे राष्ट्रीय सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्र रेकॉर्डचे संस्थापक आदी विविध पदांवर कार्यरत आहेत.

रोजगार निर्मिती, कौशल्य विकास आणि उद्योग, शिक्षण व समन्वय या क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. सय्यद यांच्या नव्या पुस्तकातून अप्रेंटीशीप ऍक्ट १९६१ या संदर्भातील महत्त्वाच्या बाबी, उद्योगांसाठी संधी तसेच युवकांसाठी रोजगाराच्या नव्या दिशा स्पष्ट केल्या जाणार आहेत.

## येरवडा डॉक्टर असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. रायचंद आढाव

**पुणे (दै. संध्या)**

येरवडा, विश्रांतवाडी, धानोरी,लोहगाव आणि परिसरातील डॉक्टरांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या 'येरवडा डॉक्टर असोसिएशन'च्या (YDA) अध्यक्षपदी विश्रांतवाडी येथील डॉ. रायचंद विठ्ठल आढाव यांची सन २०२६-२७ या कार्यकाळासाठी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. बंडगार्डन येथील बोट क्लब येथे रविवारी (दि. २९ मार्च) पार पडलेल्या असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला.



अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील जवळा येथील एका शेतकरी कुटुंबातून आलेल्या डॉ. आढाव यांचा विश्रांतवाडी, आळंदी रोड आणि कळस परिसरात सन २००३ पासून, म्हणजेच गेल्या २३ वर्षांपासूनचा प्रदीर्घ वैद्यकीय अनुभव आहे. सुरुवातीला 'सीताई नर्सिंग होम' आणि २०२३ पासून लोहगाव येथील 'पर्पल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'च्या माध्यमातून त्यांनी या भागातील आरोग्य सेवांच्या विस्तारात योगदान दिले आहे. त्यांच्या याच प्रदीर्घ अनुभवाचा विचार करून संघटनेच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

या असोसिएशनमध्ये येरवडा, नागपूर चाळ, टिंगरेनगर, फुलेनगर, विश्रांतवाडी, कळस, धानोरी आणि लोहगाव या भौगोलिक क्षेत्रातील डॉक्टरांचा समावेश आहे. नवनियुक्त अध्यक्ष म्हणून आपली भूमिका मांडताना डॉ. आढाव म्हणाले की, "असोसिएशनने टाकलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. येत्या काळात या सर्व परिसरातील डॉक्टरांचे संघटन अधिक मजबूत करण्यासोबतच, डॉक्टरांच्या व्यावसायिक अडचणी सोडवणे आणि रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी विविध आरोग्यविषयक उपक्रम राबवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट असेल."

डॉ. आढाव यांचा कार्यकाळ १ एप्रिल २०२६ पासून सुरू झाला असून, मार्च २०२७ पर्यंत ते या पदावर कार्यरत राहतील.या बिनविरोध निवडीबद्दल डॉ आढाव यांनी संघटनेच्या सर्व सदस्यांचे आभार व्यक्त केले. त्यांच्या या निवडीबद्दल परिसरातील वैद्यकीय क्षेत्रातून तसेच विविध सामाजिक स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

# क्रीडा भवन वाचविण्यासाठी महापालिका कर्मचारी एकवटले

## १००वर्षाचा इतिहास असलेल्या क्रीडा भवनाची ओळख पुसू नका!लढा देण्याचा निर्धार

**मुंबई (दै. संध्या)**




सभेच्या अध्यक्षा म्हणून श्रीमती माया आक्रे यांची निवड, मुंबई महानगरपालिका क्रीडा भवन शताब्दी वर्ष साजरे करणे, शताब्दी महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी हंगामी कार्यकारिणीची निवड, नियोजित पुनर्विकास प्रकल्पात क्रीडा भवनाचे अस्तित्व कायम ठेवणे, मुंबई महानगरपालिका क्रीडा भवनाच्या शताब्दी वर्षाच्या इतिहासातील माहितीपर निवेदने मा.महापौर ,मा.उप महापौर, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, अध्यक्ष स्थायी समिती, अध्यक्ष सुधार समिती, अध्यक्ष शिक्षण समिती, अध्यक्ष बेस्ट समिती, अध्यक्ष स्थापत्य समिती (शहर), अध्यक्ष स्थापत्य समिती ( उपनगरे), अध्यक्ष सार्वजनिक आरोग्य समिती, अध्यक्ष बाजार व उद्यान समिती, अध्यक्ष विधी समिती, अध्यक्ष महिला व बाल कल्याण समिती,मा.महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका सह आयुक्त, महानगरपालिका उप आयुक्त इत्यादी मान्यवरांना निवेदन देणे, शताब्दी महोत्सव प्रारंभ दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करणे, कार्याध्यक्ष पदावर मुख्य सुरक्षा अधिकारी व छत्रपती पुरस्कार (नेमबाज)यांची निवड करण्यात आली. मुंबई महानगरपालिका क्रीडा भवनाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त अखिल भारतीय आंतर महानगरपालिका क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याबाबत मा.महापौर , मा.महानगरपालिका आयुक्त , सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते यांना निवेदन देण्याबाबत सूचना महादेव गोळवसकर यांनी सभेत केली.सभेचे सुत्रसंचलन जालंदर चकोर यांनी केले आणि उपस्थित सर्व जेष्ठ खेळाडू, सभासद यांचे आभार मानले.

मुंबई महानगरपालिका क्रीडा भवनास ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.२६ एप्रिल १९२६ रोजी लावलेल्या रोपट्याचा कल्पवृक्ष झाला.तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी म्युनिसिपल जिमखाना स्थापन केला.त्याच वेळी जिमखाना अबाधित ठेवण्यासाठी घटना तयार केली त्याच घटनेवर आधारित क्रीडा भवनाचे प्रशासकीय कामकाज चालू आहे.दर दोन वर्षांनी सार्वत्रिक निवडणूक घेऊन सभासदांमधुन अकरा उमेदवार निवडून येतील त्यांची कार्यकारिणी समिती क्रीडा भवनाचा प्रशासकीय कामकाज करेल.कर निर्धारण व कर संकलन खात्याकडून निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते.क्रीडा भवनाचे विविध खेळांचे संघ आहेत.कबड्डी संघ ( पुरुष व महिला), कॅरम संघ (पुरुष व महिला),टेबल टेनिस संघ( पुरुष व महिला), बॅडमिंटन संघ ( पुरुष व महिला), क्रिकेट, फुटबॉल, शुटींग बॉल, व्हॉलीबॉल, बुद्धीबळ संघ ( पुरुष व महिला),खो-खो संघ, व्यायाम शाळा, शरीरसौष्ठव संघ,वेटलिफ्टींग संघ( पुरुष व महिला), पॉवर लिफ्टींग संघ (पुरुष व महिला), नेमबाजी, ॲथलेटीक्स, गिर्यारोहण इत्यादी संघांच्या खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करून मुंबई महानगरपालिका क्रीडा भवन आणि मुंबई महानगरपालिकेचे नाव उज्वल केले आहे.क्रीडा भवन कार्यकारिणी मंडळाचे मा.महानगरपालिका आयुक्त पदसिद्ध अध्यक्ष आहेत तर दोन महापालिका उप आयुक्त उपाध्यक्ष आहेत.शंभर वर्षाच्या इतिहासात मुंबई महानगरपालिका क्रीडा भवन खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर मुंबई महानगरपालिकेचे नावलौकिक करून सुवर्ण, रजत व कांस्य पदके जिंकली आहेत. राजेश मुदम टेबल टेनिस, अनिल रासम टेबल टेनिस, आत्माराम गांगर्डे, शिंदे पॉवर लिफ्टींग व वेटलिफ्टींग, गोपीनाथ पवार पॉवर लिफ्टींग, राजेश मुदम, अनिल रासम, आत्माराम गांगर्डे २००२ स्विझरलँड,२००४ जपान,२००६ जर्मनी,२००८ ब्राझील,२०१० चीन,२०११ थायलंड,२०१२ स्विडन,२०१८ अमेरिका,२०२२ ओमन,२०२४ रोम ,२०१६ श्रीलंका मास्टर कॉटेगिरीत जगातील ७५ हून अधिक देशातील १८०० खेळाडू सहभागी झाले होते.स्पर्धेत ४५००-५००० खेळाडू खेळतात.त्यात मुंबई महानगरपालिका क्रीडा भवनाच्या खेळाडूंनी अग्रक्रमांकावर आपले स्थान मिळवून मानाची अनेक पदके जिंकली.मुंबई महानगरपालिकेचे आणि क्रीडा भवनाचे नाव जगात व देशात मोठे केले.राष्ट्रीय पातळीवर २०१९ सोनपत हरियाणा,२०२२ जालंदर पंजाब येथील टेबल टेनिस स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले अशा नामवंत खेळाडूंनी क्रीडा भवनाच्या शताब्दी वर्षाच्या इतिहासात मोलाची कामगिरी बजावली आहे.आंतरराष्ट्रीय , राष्ट्रीय, राज्य स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये नेत्रदीपक कामगिरी करून विविध पुरस्कार प्राप्त खेळाडूंनी अर्जुन पुरस्कार, श्री छत्रपती पुरस्कार, दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त खेळाडू - उल्हास कर्पे छत्रपती पुरस्कार १९७३ मल्लखांब, अर्जुन पुरस्कार व छत्रपती पुरस्कार माया आक्रे - मेहेर कबड्डी १९८५, छत्रपती पुरस्कार विजया शेलार कबड्डी १९८७, छत्रपती पुरस्कार ज्योती शिंदे वेटलिफ्टींग १९९२, छत्रपती पुरस्कार संजय पाटील क्रिकेट १९९३, छत्रपती पुरस्कार ज्योती शिंदे पॉवर लिफ्टींग, छत्रपती पुरस्कार अजित तावडे नेमबाज २०००, दादोजी कोंडदेव पुरस्कार माजी न्यायमूर्ती अभय ठिपसे बुद्धीबळ १९९३.अशा खेळातील उच्च शिखरावर जाऊन नावलौकिक केलेले खेळाडू क्रीडा भवनाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त एकवटले आहेत.क्रीडा भवनाचे दहा हजारांहून अधिक सर्वसाधारण सभासद,अडीच हजार आजीव सभासद (यात नगरसेवकांचा ) समावेश आहे. मासिक वर्गणी वेतनातून जमा होते. क्रीडा भवनाचे कामगार आहेत त्यांना निवास स्थाने आहेत.

शताब्दी महोत्सवानिमित्त हंगामी कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे; अध्यक्षा श्रीमती माया आक्रे - मेहर अर्जून पुरस्कार व छत्रपती पुरस्कार (कबड्डी), आहे उपाध्यक्षा श्रीमती जयश्री खिलारी ( टेबल टेनिस), उपाध्यक्ष ॲड. विजय रावराणे (शुटींग बॉल), सचिव राजेश मुदम (टेबल टेनिस आंतरराष्ट्रीय खेळाडू),सह सचिव अजित कुशे ( आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक), खजिनदार जालंदर चकोर ( शुटींग बॉल),सह खजिनदार सुरेश घारे (क्रिकेट).

सदस्य - महादेव गोळवसकर,ॲड.सयाजी घाडगे, अनिल रासम, सुहास शिंदे, पंकज जाधव, राजेंद्र ठोंबरे, रविंद्र साळवी, अभिजित बागुल,दयाधन पाटोळे, ज्योती शिंदे,दोन वेळा छत्रपती पुरस्कार पुरस्कार,विल्सन वरळीकर (त्वायकांडो ), मंगेश बेळणेकर,राजनीस खटावकर, कैलास मटकर, विष्णू शेलार, संतोष जाधव,साजन भोईर, हेमंत कांबळे,कमलेश पांचाळ दिनांक ३० मार्च २०२६ च्या सभेत पुढील प्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.